ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादी विषयांस वाहिलेले प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधान:" इति कौटिल्य: अर्थमूली धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी प्रसिद्ध होते.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाशिवपथ, पुणे ४

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Regd. No. B. 80 Licence No. 175

वर्ष ३१ पुणे, बुधवार ५ जानेवारी, १९६६ अंक १

## विविध माहिती

**छोट्या ट्रॅक्टर्सची निर्मिती**— आसाम राज्यात छोटे ट्रॅक्टर्स निर्माण करण्याची शक्यता अजमावण्यासाठी जपानी तज्ज्ञांचे एक मंडळ गोहाटीला आले आहे. आसाम सरकारशी जपानी तज्ज्ञ बोलणी करीत आहेत. जपानच्या सहकार्याने छोटे ट्रॅक्टर्स उत्पादन करण्याचे ठरले तर आसाममध्ये अशा दोन प्रकारचे ट्रॅक्टर्स निर्माण करण्यात येतील. त्यांचे सामर्थ्य ५ ते १२ अश्वशक्तीचे असेल. प्लायवुडच्या धंद्यात लागणारा एक प्रकारचा रासायनिक डिंक भारताला सध्या आयात करावा लागतो. हा डिंक तयार करण्याचा कारखाना काढण्याच्या कामीही जपानी तज्ज्ञ साह्य करणार आहेत.

**रशिआला कापडाची निर्यात**— भारतामधून कापड निर्यात करणाऱ्या गिरण्यात अहमदाबादमधील कॅलिको गिरणीचा ४ था क्रमांक लागतो. ह्या गिरणीने १९६६ साली रशिआला ८० लाख रुपयांचे कापड निर्यात करण्याचा करार केला आहे. ह्या गिरणीने कापड निर्यात करण्यात बरीच प्रगती केली आहे. काही वर्षांपूर्वी गिरणीची कापडाची निर्यात २० लाख रुपयांच्या जवळपास होती. परंतु गेल्या वर्षी गिरणीने २·२४ कोटी रुपयांचे कापड निर्यात करण्यात यश मिळविले आहे. अलीकडे गिरणीने न चुरगळणारे, न आटणारे, आणि लवकर वाळणारे एक नव्या प्रकारचे कापड भारतात प्रथमच बनविले आहे.

**हातबनावटीच्या कागदाचा उपयोग**—हिंदमधील पोस्ट खाते रजिस्टर्ड पाकिटे पाठविण्यासाठी कापडी अस्तर असलेल्या कागदाचा उपयोग करते. अशा प्रकारच्या पाकिटांसाठी दरसाल सुमारे २,५०० रीम कागद परदेशातून आयात करण्यात येतो आणि त्यासाठी अर्थातच बरेच परदेशीय चलन खर्चावे लागते. कापडी कागदाऐवजी आता हातबनावटीच्या देशी कागदाचा उपयोग रजिस्टर्ड पाकिटासाठी करण्याचा विचार चालू आहे. हा प्रयोग यशस्वी झाला तर कापडी कागदाच्या आयातीचा खर्च वाचेल. तथापि रजिस्टर्ड इन्शुअर्ड पाकिटासाठी मात्र अशा कागदाची थोडी आयात करावी लागेल.

**गुजरातमधील नवे बंदर**—गुजरातमधील सुरतपासून ४ मैलांवर असलेले मगदाला बंदर वाहतुकीस खुले करण्यात आले आहे. हे बंदर वापरात आल्यामुळे गुजरात, दक्षिण राजस्थान, उत्तर महाराष्ट्रातील काही भाग आणि मध्यप्रदेश ह्यांची सोय होणार आहे. ह्या बंदरातून अन्नधान्ये, खते, खनिजे, केळी इत्यादींचा परदेशीय व्यापार करता येईल. दरसाल सुमारे ६० हजार टनांची वाहतूक होईल असा अंदाज आहे.

**अशोक हॉटेलला झालेला नफा**— अशोक हॉटेल्स लि. ह्या सरकारी मालकीच्या कंपनीने १९६४–६५ सालात ४१·६७ लाख रुपये नफा कमावला. गेल्या वर्षी कंपनीला ३७·२७ लाख रुपये नफा झाला होता. अलीकडे दिल्ली येथे नवी नवी हॉटेल्स निघत असून ह्या धंद्यांतील स्पर्धा वाढलेली आहे. तरीपण कंपनीचा नफा समाधानकारक राहील असा अंदाज करण्यात आला आहे. झालेल्या नफ्यातून गेल्या दोन वर्षांसाठी नफ्याचा संकलित अग्रहक्क असलेल्या भागभांडवलावर कंपनीने ७·१५ टक्के नफा वाटला आहे.

**कागदपत्र लपविण्याचा प्रयत्न**— मुंबईमधील एका बड्या रासायनिक कारखान्याच्या मालकाच्या कचेरीवर आयकर खात्याच्या अधिकाऱ्यांनी छापा घातला असता त्याच्या व्यवहारासंबंधीचा एक महत्त्वाचा दस्तऐवज सदर कारखानदाराने गिळण्याचा प्रयत्न केला. अधिकारीवर्ग झडतीत कागदोपत्री पुरावा गोळा करण्याच्या प्रयत्नात असताना कारखानदाराने त्यांचे लक्ष चुकवून हा प्रयत्न केला. परंतु एका अधिकाऱ्याचे तिकडे वेळेवर लक्ष जाऊन त्याने दस्तऐवज सुरक्षितपणे बाहेर काढला. हा दस्तऐवज फार महत्त्वाचा आहे, असे आढळून आले आहे.

**संपूर्ण देशी बनावटीची स्कूटर**— दुर्गापूर येथील मध्यवर्ती यंत्रालय संशोधन संस्थेने संपूर्णपणे देशी बनावटीची स्कूटर बनविण्यात यश मिळविले आहे. स्कूटरचे नाव 'जवान' असे ठेवण्यात आले असून तिच्या बनावटीला लागणारे सर्व भाग भारतातच बनविण्यात आले आहेत. हिंदी यंत्रज्ञांची एंजिनिअरिंगबद्दलची कर्तबगारी त्यामुळे दिसून येते. स्कूटर हे वाहन अलीकडे खूपच लोकप्रिय झाले आहे. 'जवान' स्कूटर्सची किंमत अद्याप ठरलेली नाही.

**नव्या कारखान्यांना खुली बाजारपेठ**—मार्च १९६७ पर्यंत खताचे कारखाने काढण्याचे जे परवाने दिले आहेत, त्या परवानाधारकांना खताचे व्यापारी उत्पादन सुरू केल्यानंतर ७ वर्षेपर्यंत खुल्या बाजारपेठेचा लाभ मिळणार आहे. ह्या उद्योगधंद्यात परदेशीय भांडवलाच्या गुंतवणुकीला उत्तेजन मिळावे म्हणून खताच्या किंमतीवरील अगर बाजारपेठेवरील नियंत्रणे त्या मुदतीत घालण्यात येणार नाहीत. मद्रास राज्यात अमेरिकेच्या मदतीने काढण्यात यावयाचा खताचा कारखाना काढणे आता सुलभ होणार आहे. खाजगी मालकीच्या विभागात ५ कारखान्यांना परवाने देण्यात आले होते. परंतु त्यांच्या परदेशीय सहकाऱ्यांना उद्योगधंद्यात सुटणाऱ्या नफ्याविषयी शंका आल्याने ते अद्यापपर्यंत निघू शकलेले नाहीत.

**घड्याळाच्या कारखान्याला अडचण**—हिंदुस्थान मशीन टूल्सच्या घड्याळाच्या कारखान्याचा दुप्पट विस्तार करण्याची योजना मध्यवर्ती सरकारच्या विचाराधीन होती. परंतु परदेशीय चलनाच्या सध्याच्या टंचाईमुळे हे काम आता लांबणीवर पडणार आहे. घड्याळे तयार करण्यासाठी काही मुख्य भागांची अजूनही आयात करावी लागते. तरीही सध्या होत असणारे उत्पादन चालू ठेवण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.

**बोकॅरो कारखान्याचा खर्च**—बोकॅरो येथे काढण्यात यावयाचा चौथ्या सार्वजनिक मालकीच्या विभागातील पोलाद कारखान्यासंबंधीचा अहवाल रशियाकडून भारत सरकारकडे आला आहे. ह्या कारखान्याच्या पहिल्या टप्प्यासाठी ३९६ कोटी रुपये लागतील असा अंदाज प्रथम करण्यात आला होता. परंतु आता करण्यात आलेल्या नव्या अंदाजाप्रमाणे हा खर्च ५७५ कोटींच्या घरात जाईल. संपूर्ण कारखाना उभारण्यास ७८० कोटी रुपये लागणार आहेत.

**मिश्र पोलाद कारखान्यासाठी मदत**—दुर्गापूर येथे ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमात स्थापन करण्यात येणाऱ्या मिश्र पोलादाच्या कारखान्याच्या उभारणीत सहकार्य करण्याची तयारी जपानने दाखविली आहे. भारताच्या दौऱ्यावर असलेल्या जपानच्या प्रतिनिधींनी ह्या कारखान्यासंबंधी पोलाद व खाण-मंत्र्यांशी अलीकडेच चर्चा केली. ह्या कारखान्याची उत्पादन-क्षमता दुपटीने वाढविण्याचा विचार भारत सरकार करीत आहे.

**मातृपदाच्या रजेत कपात**—केरळ राज्याच्या कुटुंब-नियोजन मंडळाने अशी शिफारस केली आहे की, सरकारच्या स्त्री-नौकरांच्या नौकरीच्या काळात त्यांना फक्त तीन वेळाच बाळंतपणाची हक्काची रजा देण्यात यावी. शिफारस अमलात आणावयाची ठरल्यास त्यासाठी नौकरीच्या नियमात दुरुस्ती करावी लागेल. अजून शिफारस सरकारच्या विचाराधीन आहे. कुटुंबनियोजन करण्यास सरकारी नौकरांचे मन वळवावे असा शिफारसीचा हेतू आहे.

**हेलिकॉप्टरची निर्मिती**—बंगलोर येथील हिंदुस्थान एरोनॉटिक्स कारखान्यात फ्रान्सच्या सहकार्याने हेलिकॉप्टर्सच्या निर्मितीस प्रारंभ करण्यात येणार आहे. अशा प्रकारच्या काही विमानांची जुळणीही करण्यात आली आहे. विमाने तयार करण्यासाठी लागणारे कसब आत्मसात करून फ्रान्सला शिक्षण घेण्यासाठी गेलेले हिंदी एंजिनिअर्स परत आले आहेत.

**प्रवासी बंगल्यांतून भात नाही**—केरळ सरकारने राज्यांतील प्रवासी बंगल्यांतून मुक्काम करणाऱ्या प्रवाशांना जेवणात भात देण्यात येणार नाही असे जाहीर केले आहे. त्याचप्रमाणे परदेशीय प्रवासी सोडून इतरांना सोमवारी संध्याकाळी भोजन देण्यात येणार नाही. तांदुळाच्या टंचाईमुळे सरकारला हे निर्बंध अमलात आणणे भाग पडले आहे.

**पाकिस्तानच्या दळणवळणात अडचणी**—पश्चिम पाकिस्तान व पूर्व पाकिस्तान ह्यांच्यामधील विमानवाहतूक भारत-पाक संघर्षापासून सीलोन मार्गाने चालू आहे. ढाका ते रावळपिंडी हे अंतर १५०० मैलांचे आहे. परंतु सीलोनमार्गे ते ह्यापेक्षा दुपटीने अधिक पडते. शिवाय ह्या मार्गाने खर्चही फार येतो. पाकिस्तानने तिबेट-ब्रह्मदेश मार्गाने हवाई वाहतूक करण्याचा प्रयत्न केला. परंतु तिबेटमधील पर्वतांच्या रांगा वैमानिकांना धोक्याच्या वाटतात.

**एंजिनांना बाजारपेठ**—पश्चिम आशियातील देशांचा दौरा करण्यासाठी हिंदी लोकसभेचे एक प्रतिनिधी मंडळ धाडण्यात आले होते. इराण, इराक, जॉर्डन, सायप्रस, लेबेनॉन, इत्यादी देशांचा दौरा करून मंडळ परत आले आहे. भारतात तयार झालेल्या तेलावर चालणाऱ्या एंजिनांनी ह्या देशातून चांगले नाव कमाविले आहे, असे मंडळाला आढळून आले. योग्य ती काळजी घेतल्यास पश्चिम आशियातील देशात हिंदी मालाला चांगला वाव आहे असे मंडळाचे मत आहे.

**१० हजार खोटी शिधापत्रके**—गुजरात राज्यात खोटी शिधापत्रके हुडकून काढण्याची मोहीम सुरू करण्यात आली आहे. बडोदा, भडोच, बलसाड आणि पंचमहाल ह्या जिल्ह्यांत करण्यात आलेल्या तपासात आतापर्यंत १० हजार बनावट रेशनकार्डे उघडकीला आली आहेत. ३८,३७० अस्तित्वात नसलेल्या लोकांची नावे खोडण्यात आली आहेत. ह्या तपासामुळे दरमहा २.५ लाख किलोग्राम धान्याची बचत होणार आहे.

**सहकारी कारखान्यांच्या उत्पादनात वाढ**—१९६४-६५ सालातील साखरेच्या हंगामात सहकारी साखर कारखान्यांच्या उत्पादनांत तिपटीपेक्षा अधिक वाढ झाली. सहकारी साखर कारखान्यांनी उत्पादनाचा आजवरचा उच्चांक गाठून ८ लाख ६ हजार टन साखर निर्माण केली. देशातील ५० सहकारी कारखान्यांनी एकूण उत्पादनाच्या एक चतुर्थांश साखर उत्पादन केली. ह्या हंगामात २ नवे सहकारी साखर कारखाने उत्पादन करू लागले.

**बंगाली नोकरांविरुद्ध मोहीम**—पूर्व पाकिस्तानातील प्रमुख सरकारी जागांवर बंगाली मुसलमानांच्याऐवजी पश्चिम पाकिस्तानातील अधिकाऱ्यांच्या नेमणुका कराव्या असा हुकूम अयूबखान राजवटीने काढला असल्याची वार्ता आहे. पूर्व पाकिस्तानमधील क्रांतिकारी मंडळास बंगाली मुसलमान गुप्तपणे पाठिंबा देतात व त्यामुळे पूर्व पाकिस्तानात विमोचनाची चळवळ नेट धरू लागली आहे असा संशय पाकिस्तान सरकारला आला आहे.

**नव्या तेलाच्या गिरण्यांना विरोध**—सौराष्ट्र तेलगिरणी संघटनेने तांत्रिक-आर्थिक समितीपुढे आपले म्हणणे सादर केले आहे. सरकीपासून तेल काढण्यासाठी लागणाऱ्या यंत्रसामग्रीची आयात करण्यास परवानगी द्यावी अशी मागणी करून संघटनेने आपल्या निवेदनात असे म्हटले आहे, की शेंगदाण्याच्या तेलाचा तुटवडा असल्याने सरकीचे तेल काढणे आवश्यक झाले आहे. शेंगदाण्याचा पुरवठा अपुरा असल्याने नव्या तेलगिरण्यांच्या स्थापनेसाठी परवाने देण्यात येऊ नयेत, अशीही मागणी संघटनेतर्फे करण्यात आली आहे.

**फ्रान्सचे आयात धोरण**—युरोपीय सामायिक बाजारपेठेचे फ्रान्स हे एक प्रमुख सभासद राष्ट्र आहे. भारतासारख्या विकसनशील देशांकडून करण्यात येणाऱ्या आयातीत पक्का माल असू नये अशी भूमिका फ्रान्सने घेतली आहे. त्यामुळे अशा देशांच्या युरोपातील निर्यातीत घट होण्याची शक्यता आहे. पूर्व युरोपातील देशांकडून फ्रान्सला निर्यात करण्यात येणाऱ्या पक्क्या मालाबाबत मात्र फ्रान्स आपल्यापुरत्या सवलती देणार आहे. पूर्व युरोपातून फ्रान्सला निर्यात होणाऱ्या औद्योगिक मालाचा हिस्सा ठरवून देण्याची पद्धत आता बंद करण्यात येणार आहे.

# अर्थ

बुधवार, ५ जानेवारी, १९६६





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## सध्याच्या आर्थिक परिस्थितीचे विश्लेषण

### शंतनुरावांच्या सरकारला स्पष्ट सूचना आणि कारखानदारांच्या हार्दिक सहकार्याचे आश्वासन

फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीचे अध्यक्ष श्री. शंतनुराव किर्लोस्कर ह्यांनी मराठा चेंबरच्या वार्षिक सभेच्या अध्यक्षपदावरून भाषण करताना सरकारी मूलभूत आर्थिक धोरणात सुधारणा होण्याची आवश्यकता प्रतिपादन केली आणि त्याबाबत महत्त्वाच्या सूचनाही केली. श्री. शंतनुराव हे स्वदेशीच्या पुरस्कारासाठी कारखानदारीचा अवलंब करणाऱ्या लक्ष्मणरावांचे कर्तृत्ववान वारसदार आहेत, हे लक्षात ठेवले पाहिजे; त्यांचा दृष्टिकोन व्यापारी हितसंबंधापेक्षा राष्ट्रीय हिताचा आहे, हे उघड आहे. ते म्हणाले की—

वाढत्या किंमती, परकीय चलनाचा तुटवडा, अन्नधान्याची टंचाई आणि अंतर्गत पैसा उभा करण्यांत येणाऱ्या अडचणी या सर्व गोष्टी गेली कित्येक वर्षे भारत सरकारने स्वीकारलेल्या आर्थिक धोरणाचा परिणाम आहेत. या मुलभूत आर्थिक धोरणात जर बदल झाला नाही तर हे प्रश्न सोडविणे कठीण आहे. राज्यकारभारावरील वाढत जाणारा भरमसाठ खर्च व त्याचप्रमाणे सरकारच्या निरनिराळ्या योजनांवर होत असलेला विनाफायदा खर्च यामुळे सरकारला जादा पैसा उभा करणे जरूर पडते. त्यामुळे तुटीचे अंदाजपत्रक किंवा भरमसाठ करवाढ या मार्गाने सरकारला आतापर्यंत हा पैसा उभा करणे भाग पडले. यामुळे किमतीवर परिणाम होऊन किमती भरमसाठ वाढल्या व आता तर इतर काहीही उपाय योजले तरी ह्या किमती आटोक्यात येण्याचे चिन्ह दिसत नाही. या किमतीवाढीमुळेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भारतीय मालाची निर्यात करणे दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे व पर्यायाने परकीय चलनाचा आपल्याला अतिशय तुटवडा जाणवू लागला आहे. या परिस्थितीला तोंड देण्याकरिता सरकारने राज्य-कारभारावरील भरमसाठ खर्च तावडतोब कमी करावा, अनुत्पादक खर्चाला काट मारावी. त्यामुळे करवाढ करावी लागणार नाही व पर्यायाने किंमतीही आटोक्यात येतील.

संरक्षणासाठी सर्व प्रकारचे उत्पादन वाढविण्याचे बाबतीत कारखानदारांतर्फे सर्व प्रकारच्या सहकार्याचे त्यांनी आश्वासन दिले. संरक्षणासाठी उत्पादन वाढविताना सरकारी व खाजगी कारखानदारी असा सरकारने भेद करू नये, खाजगी कारखानदारांनाही युद्धोपयोगी वस्तू, शस्त्रास्त्रे, दारुगोळा व अवजड यंत्रसामग्री तयार करण्यासाठी सरकारने त्यांना संपूर्ण सहभागी करून घ्यावे. यासाठी भारत सरकारने सध्याचे औद्योगिक धोरण बदलून घेण्याची आवश्यकता आहे. भावी संकटकाळाला तोंड देण्यासाठी औद्योगिक वाढीवर भर देण्यात यावा, सर्व प्रकारचे उत्पादन वाढविण्यात यावे, कारखानदारांना युद्धोपयोगी वस्तू तयार करण्याची तयारी ठेवण्यासाठी त्यांना लहान सहान प्रमाणात अधूनमधून अशा वस्तूंचे उत्पादन करण्यासाठी मागणी सरकारने करावी, युद्धकाली उत्पादनक्षेत्रात खंड पडू नये म्हणून पर्यायी योजना तयार ठेवावी.

देशाची निर्यात वाढवून आयात मालाची किंमत देणे हे जरी जरूर असले तरी नजीकच्या काळात आयात कमी करणे जरूर आहे. देशात तयार होणाऱ्या अनेक वस्तूंची आयात सध्या केली जाते. खुद्द सरकारतर्फेही अशा वस्तू आयात केल्या जातात. अशा वस्तूंच्या आयातीना बंदी करणे जरूर आहे. त्याचप्रमाणे आपल्या एकंदर आयातीपैकी निम्म्याहून अधिक रकमेची आयात सरकार करीत असते. या सरकारी आयातीची कसून छाननी होणे जरूर आहे. त्याचप्रमाणे साध्यासुध्या गोष्टींचे उत्पादन करण्यास परकीय सहयोगास परवाने दिले जातात. तंत्रकुशल व आवश्यक वस्तूंच्या उत्पादनासाठी जरी परकीय सहयोगाची आवश्यकता असली तरी अशा अनावश्यक व साध्या वस्तूंच्या उत्पादनासाठी परकीय सहयोगास परवाने दिले जाऊ नयेत.

---

### "प्रावदा"चा पाकिस्तानला सल्ला

रशियाच्या कम्युनिस्ट पक्षाचे मुखपत्र 'प्रावदा' ह्यात पाकिस्तानला सल्ला देणारा एक लेख प्रसिद्ध करण्यात आला आहे. लेखातील विचारसरणीप्रमाणे, पाकिस्तानापुढील प्रश्न दोन कारणांमुळे उत्पन्न झालेले आहेत. पहिले, राजकारणाची एकांगी समजूत आणि दुसरे लष्करी गटात सामील होण्याचे धोरण. लेखात पाकिस्तानच्या आर्थिक प्रश्नांची आणि भारताबरोबर झालेल्या संघर्षाचीही चर्चा करण्यात आली आहे. पाकिस्तानच्या सध्याच्या धोरणामुळे त्याच्यापुढील अडचणी निर्माण झालेल्या आहेत, ह्या गोष्टीची आणि ह्या अडचणींचा निरास करण्याच्या कामी भारताबरोबर असणारे संबंध सुधारण्याच्या आवश्यकतेची जाणीव पाकिस्तानातील लोकांना अधिकाधिक प्रमाणात होत असल्याचे लेखात नमूद करण्यात आले आहे. लेख कराचीहून धाडण्यात आलेला आहे.

---

### मुख्य मंत्र्यांची शेतीविषयी आस्था

"मुख्य मंत्री श्री. नाईक हे निजलेले असताना त्यांच्या तोंडावर एखाद्याने पाण्याचे काही थेंब उडवले, तर त्यांची प्रतिक्रिया काय होईल ?" संरक्षणमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण ह्यांनी यवतमाळ येथे जिल्हा परिषदांच्या अधिकाऱ्यांच्या व कार्यकर्त्यांच्या सभेत हा प्रश्न विचारला आणि स्वतः त्याचे उत्तर दिले, तेव्हा हशा पिकला आणि टाळ्यांचा कडकडाट झाला. 'छान ! आताच्या पिकांना उपयोगी पडणारा पाऊस सुरू झाला वाटतं !' असे पुटपुटत श्री. नाईक उठतील, असे श्री. चव्हाण म्हणाले. शेतीबद्दल मुख्य मंत्र्यांना वाटणाऱ्या आस्थेबद्दल श्री. चव्हाणांनी ह्याप्रकारे त्यांना धन्यवाद दिले.

---

## "अर्था"चे ३२ व्या वर्षांत पदार्पण

"अर्थ एव प्रधानः इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति" हे कौटिल्याच्या अर्थशास्त्रातील वचन "अर्था"चे पहिल्यापासून बोधवचन आहे. धर्म, अर्थ आणि काम ही परस्परावलंबी आहेत, तरी अर्थावाचून धर्म व काम असाध्य असल्यामुळे कौटिल्याने अर्थास प्राधान्य दिले आहे, त्याचे रहस्य स्पष्ट आहे. शेती, उद्योगधंदे, इत्यादी अर्थार्जनाच्या साधनांच्या योग्य संघटनेवर व कार्यक्षमतेवर समाजाची सुस्थिती, इतकेच नव्हे तर राष्ट्राचे स्वातंत्र्य अवलंबून असते, हे कळले तरी वळायला चिनी व पाकिस्तानी आक्रमणाची आपत्ती ओढवावी लागली!

महाराष्ट्रात तर अर्थयोगाचे महत्त्व विशेष होते व आहे; कारण आपल्यामधील आर्थिक दुर्बलतेचे वैगुण्य आपल्या पदोपदी आड येत आहे. सामाजिक संस्कृतीत ललित वाङ्मयास जसे स्थान आहे, त्याच तोडीचे स्थान अर्थविषयक वाङ्मयास प्राप्त होणे अगत्याचे आहे. ही उणीव भरून काढण्याचे साहस प्रा. वा. गो. काळे ह्यांनी १९३५ मध्ये "अर्थाची" स्थापना करून केले. १९४६ साली, त्यांच्या मृत्यूनंतर, "अर्थाची" जबाबदारी प्रस्तुत संपादकाकडे आली आणि महाराष्ट्रीय जनतेने त्यालाही नियोजित कामगिरी पार पाडण्यास सक्रिय प्रोत्साहन दिले आहे. त्याबद्दल संपादक त्या सर्वांचा ऋणी आहे.

मान्यवर आर्थिक तज्ज्ञांनीही "अर्था"चे वेळोवेळ कौतुक केले, त्यामुळेही संपादकाची प्रेरणा टिकून राहण्यास मोलाची मदत झाली आहे. उदाहरणार्थ, रिझर्व्ह बँकेचे भूतपूर्व गव्हर्नर आणि भारताचे भूतपूर्व अर्थमंत्री श्री. चिंतामणराव देशमुख ह्यांनी आपण होऊन लिहिले :—

"कोणत्याही जनसत्ताक राज्यविधानाचा मुख्य आधारस्तंभ म्हणजे चालू घडामोडींविषयी समंजसपणा व देशापुढील योजना व ध्येय यासंबंधी सबोध उत्साह. हे आधारस्तंभ बळकट करण्याची जबाबदारी विशेषतः वृत्तपत्रांवर असते. सर्वसाधारण समाजाला आर्थिक घडामोडी ह्या स्वभावतःच दुर्बोध असतात व सध्याच्या गुंतागुंतीच्या घडामोडींची अंतःप्रवणता समजणे त्याला विशेष कठीण असते. त्या समजून घेण्यात त्यांना साहाय्य देणे हे आपल्या "अर्थ" या साप्ताहिकाचे कार्य राष्ट्रहिताच्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहे. "अर्थ" ही कामगिरी फार उत्कृष्ट रीतीने बजावीत आहे असे मी स्वानुभवावरून दृढ विश्वासाने सांगू शकतो. योग्य ते लोकसाहाय्य मिळून "अर्था"ची ही कामगिरी अव्याहत प्रभावीपणाने चालो."

"अर्था"वरील जनतेचा लोभ असाच कायम राहील, असा विश्वास वाटतो.

—श्री. वा. काळे

---

## जनरल निम्मो ह्यांची मुदतवाढ?

भारत व पाकिस्तान ह्यांच्यामधील युद्धबंदी रेषेवर निरीक्षणाचे काम करणाऱ्या लष्करी पथकाचे प्रमुख जनरल रॉबर्ट निम्मो हे आणखी सहा महिने त्या जागेवरच राहण्याची शक्यता आहे. पाकिस्तानमधील राजकारण्यांकडून मिळणारी शत्रुत्वाची वागणूक बोचक झाल्यामुळे आपणास ताबडतोब निवृत्त करावे अशी इच्छा त्यांनी काही दिवसांपूर्वी व्यक्त केली होती. काश्मीरमध्ये पाकिस्तानने घुसविलेल्या दंगेखोरांबद्दलचा अहवाल त्यांनी प्रसिद्ध केल्यापासून ते पाकिस्तान सरकारच्या मर्जीतून उतरले होते.

## आर्थिक नियोजनात विवेक पाहिजे

### श्री. सोवनी ह्यांची स्पष्टोक्ती

अखिल भारतीय आर्थिक परिषदेचे ४८ वे अधिवेशन बनारस येथे २९ ते ३१ डिसेंबर, १९६५ रोजी झाले, त्याचे अध्यक्ष गोखले इन्स्टिट्यूटचे प्रा. नी. वि. सोवनी हे होते. भारताच्या आर्थिक योजनांची त्यांनी छाननी करून, योजनाकारांनी अल्पावधीतच योजनाबद्ध विकासाबाबत जनतेच्या उत्साहाचे संपूर्ण निरुत्साहात रूपांतर कसे केले आहे, त्याचे विश्लेषण केले. योजनाविषयी स्वप्नाळू स्वरूपाच्या कल्पना, योजना अमलात आणण्याच्या श्रद्धेबद्दल आणि पात्रतेसंबंधी फाजील विश्वास, ही अपयशाची कारणे असल्याचे त्यांनी सांगितले. हिंदी नियोजनाच्या मर्यादाच मुळी नियोजकांनी ध्यानांत घेतल्या नाहीत; काय शक्य आहे ते न पाहता काय हवे त्याकडेच लक्ष देऊन दिशाभूल केली! प्रगतीच्या गतीचे त्यांचे अंदाज न चुकले तरच आश्चर्य. एखादा अंदाज चुकला, तर पर्यायी योजना करून ठेवावी, ही कल्पनाच नियोजकांना सुचली नाही; अग्रस्थानांच्याच ते मागे लागले. राजकीय कारणासाठी घेतलेल्या निर्णयांमुळे वाढणारा खर्चाचा बोजा स्पष्ट करून सांगितला नाही. देशाच्या वेगवेगळ्या विभागांचे वैशिष्ट्य लक्षात न घेता, सबंध देशाला एकाच प्रकारचे तोडगे सुचविण्यात आले. आर्थिक क्षेत्रातील ताण नीट विभागला जावा, ह्याकडेही दुर्लक्ष झाले. खर्चाच्या रकमेवरून नियोजनाचे यश मोजण्यापेक्षा, प्रत्यक्ष उत्पादनवाढीनेच ते मोजायला हवे. परिस्थितीप्रमाणे वाहात जाण्यापेक्षा योग्य धोरणे आखून परिस्थिती आटोक्यात ठेवण्याचा प्रयत्न करायला हवा.

"भावनेने भारावलेल्या नियोजन क्षेत्रात मी विवेकाचा आवाज उठवण्याचा प्रयत्न करीत आहे. त्याचा तत्काळ परिणाम झाला नाही, तरी अखेर विवेकाचा सुपरिणामी विजय झाल्याविना राहणार नाही." असा प्रा. सोवनी ह्यांनी आपल्या भाषणाचा समारोप केला.

---

## अमेरिकेच्या मदतीनेच पाकिस्तानच्या विकासाला अडथळा

अमेरिकेने पाकिस्तानला दिलेल्या आर्थिक मदतीचा हेतू लष्करी असल्यामुळे ह्या मदतीने पाकिस्तानची आर्थिक प्रगती होण्याऐवजी तीत व्यत्यय मात्र आला, अशी टीका रशियातील एका वृत्तपत्रात करण्यात आली आहे. टीकेत पुढे असे म्हटले आहे की खुद्द पाकिस्तानमधील अर्थशास्त्रज्ञांनीही अमेरिकेने लष्करी हेतूने दिलेली मदत ही पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेतील सर्वांत कच्चा दुवा ठरला असल्याची कबुली दिलेली आहे. ह्या गोष्टीची जाणीव अधिकाधिक प्रमाणात होत असून पाकिस्तानातील व्यापारी आणि औद्योगिक गट अमेरिकेवरील परावलंबित्वाचा शेवट करण्यात यावा, अशी मागणी पाकिस्तान सरकारकडे जोराने करू लागले आहेत. गेल्या जुलैमध्ये प्रे. जॉन्सन ह्यांनी मदत थांबविल्यावर पाकिस्तानच्या लोकांना कटु अनुभवाला तोंड द्यावे लागले.

---

**दिल्लीमधील थंडीचे बळी**—दिल्लीमधील कडक थंडीमुळे ६ बेघर लोकांना मृत्यू आला. निवाऱ्याची जागा नसल्याने पदपथावर दिवस काढणाऱ्या लोकांचे हिवाळ्यात फार हाल होतात. अशा लोकांची दिल्लीतील संख्या ३ हजारांपासून १२ हजारांपर्यंत असल्याचा अंदाज आहे. दिल्ली नगरपालिकेने केलेली निवाऱ्याच्या जागेची सोय सुमारे २ हजार लोकांना पुरण्याइतकीच आहे.

## चहाच्या मळ्यांची सरकारी मालकी ?

भारताची अर्थव्यवस्था मिश्र स्वरूपाची ठेवण्यात आलेली आहे. म्हणजे, त्यात सरकारी मालकीच्या विभागाबरोबरच खाजगी मालकीच्या विभागालाही स्थान देण्यात आलेले आहे. मूलभूत महत्त्वाचे उद्योगधंदे सरकारी मालकीचे ठेवण्याचे भारत सरकारचे धोरण असून सार्वजनिक मालकीच्या विभागाचा विस्तारही करण्यात येत आहे. कारखानदारीपुरते हे धोरण यशस्वी ठरण्याची शक्यता आहे. पण शेतीसारख्या अनिश्चित स्वरूपाच्या व्यवसायात सरकारने पडावे की नाही ह्याबद्दल शंका व्यक्त करण्यात येत आहे. तथापि, अव्यवस्थित आणि अकार्यक्षम कारभारामुळे कापड गिरण्यांसारख्या व्यवसायात सरकारला हस्तक्षेप करावा लागला आहे. आर्थिक दृष्ट्या न परवडणारे आणि गैरकारभाराने व्याप्त झालेले काही चहाचे मळेही चालविण्यास घेण्याचा मध्यवर्ती सरकारचा विचार आहे. टी बोर्डाचे अध्यक्ष श्री. भगवान सिंग ह्यासंबंधी बोलताना म्हणाले की अजून ह्यासंबंधी निर्णय घेण्यास अवकाश आहे. असे मळे ताब्यात घेतले तर ते कसे चालवावे ह्याचा विचार करावा लागेल. चहाच्या मळ्यांचे व त्यांत गुंतलेल्या भांडवलाचे हिंदीकरण होत असल्याची स्पष्ट चिन्हे अलीकडे दिसून येत आहेत. गेल्या दोन वर्षांच्या काळात बऱ्याच चहाच्या मळ्यांची मालकी बदललेली आहे. ह्या धंद्यात अनेक तरुण माणसे येत असल्याचेही दिसून येत आहे. चहाच्या मळ्यांना इतर धंद्यांप्रमाणे आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागते. ह्या अडचणीतून वाट काढण्यासाठी काही तरी कायम स्वरूपाच्या व्यवस्थेची जरूर आहे. भारत सरकार चहाच्या मळ्यांना मदत करण्यासाठी एक कॉर्पोरेशन स्थापन करण्याचा विचार करीत आहे.

## अवर्षणाचा निर्यातीच्या उद्दिष्टांवर परिणाम

हिंदचे व्यापारमंत्री श्री. मनुभाई शहा बंगलोर येथे बोलताना म्हणाले की चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमात ५,१०० कोटी रुपयांच्या मालाची निर्यात करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आलेले आहे. ते कमी करण्याचा सरकारचा विचार नाही. चालू वर्षी देशाच्या अनेक भागांत अवर्षणाचा तडाखा बसलेला आहे. त्यामुळे शेतीचा माल आणि वनस्पती तेले ह्यांची निर्यात कमी होण्याचा संभव आहे. ह्या मालाच्या निर्यातीत सुमारे ८० ते १०० कोटी रुपयांची घट होण्याची शक्यता आहे. तेले आणि तेलबिया ह्यांच्या निर्यातीमुळे सामान्यतः ३० कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची प्राप्ती होते. परंतु ह्या वर्षी मात्र ह्या मालाच्या निर्यातीमुळे परदेशीय चलन मिळणार नाही. भारताच्या खाद्यतेलाच्या मालाच्या किंमती इतर देशांपेक्षा कितीतरी अधिक आहेत. त्याचाही परिणाम त्यांच्या निर्यातीवर होऊ शकेल. जगाच्या बाजारपेठेत साखरेच्या किंमती घसरलेल्या आहेत. तथापि पक्का माल, एंजिनिअरिंगचा माल, रासायनिक पदार्थ, कापड, इत्यादी मालाच्या किंमती वाढत आहेत. त्यामुळे शेतीच्या मालाच्या निर्यातीत होणाऱ्या घटीचे प्रमाण भरून काढता येणे शक्य होईल. गेल्या वर्षी ८२० कोटी रुपयांचे उद्दिष्ट गाठण्यात आले होते. तेच ह्या वर्षी गाठण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. कदाचित १० ते २० कोटी रुपयांची अधिक निर्यात होण्याचा संभव आहे. दरसाल ८०० कोटी रुपयांच्या आसपास असलेली निर्यात १,२०० कोटी रुपयांपर्यंत वाढविण्याच्या योजना आखण्यात येत आहेत. तथापि, आर्थिक प्रगती मंद प्रमाणात चालू ठेवण्यासाठी सुद्धा दरसाल २,००० कोटी रुपयांच्या मालाची निर्यात करणे आवश्यक आहे.

---

## चीनच्या उत्पादनात झालेली घट

रशियात प्रसिद्ध करण्यात आलेल्या माहितीप्रमाणे १९६०–७० ह्या दशकाच्या मध्याला चीनची अर्थव्यवस्था काहीशी दुबळी झालेली आहे. ह्या माहितीप्रमाणे गेल्या वर्षी चीनने ९५ लाख मेट्रिक टन पोलाद निर्माण केले. पण, १९५९ सालातील पोलादाचे उत्पादन १·३५ कोटी टन होते. १९६३ साली तर चीनमधील पोलादाचे उत्पादन ८० लक्ष मेट्रिक टनापर्यंत घसरले असावे. कोळशाच्या उत्पादनातही घट झाली आहे. १९६४ साली चीनने २०·९ कोटी मेट्रिक टन कोळशाचे उत्पादन केले होते. १९५९ साली कोळशाचे उत्पादन ३४·७८ कोटी टनाच्या आसपास होते. चीनमधील अन्नधान्याची टंचाई तर कायम स्वरूपाचीच आहे. गेल्या वर्षी चीनने १८ कोटी मेट्रिक टन धान्याचे उत्पादन केले होते. १९५९ सालामधील धान्याचे उत्पादन २७ कोटी मेट्रिक टनाच्या घरात होते. गेल्या काही वर्षांत चीन परदेशातून गव्हाची आयात करीत आहे, ती वरील माहितीशी सुसंगत वाटते.

---

## चीनने बांधलेले लष्करी महत्त्वाचे रस्ते

चीनने अक्साई चीनपासून ल्हासापर्यंत १,३०० मैल लांबीचा पक्का सडकीचा रस्ता बांधून पुरा केला आहे. हा रस्ता काही ठिकाणी भारताच्या सरहद्दीपासून अवघ्या ५० मैलांवरून जातो. ह्या रस्त्यामुळे चीनच्या लष्कराची दळणवळणाची अधिक चांगली सोय झाली आहे. भारताच्या उत्तर सरहद्दीवरील बहुतेक मोक्याच्या ठिकाणी सैनिकी वाहतूक करणे चीनला आता अधिक सुलभ झाले आहे. ह्या रस्त्यावरून अवजड लष्करी वाहनांची वाहतुकही सुरू झालेली आहे. ह्या मुख्य रस्त्यासेरीज तिबेटच्या अंतर्भागात असलेले लष्करी तळ भारताच्या सरहद्दीला जोडणारे अनेक छोटे रस्तेही बांधण्यात आले आहेत. गेल्या चार महिन्यात आणखी दोन रस्ते बांधण्यात आले आहेत. त्यापैकी एक याटुंग ते सिक्कीम सरहद्दीपर्यंत आणि दुसरा ल्हासा ते भागला रिज असा जातो. भागला रिज चीन व भारतामधील आंतरराष्ट्रीय सरहद्द आहे.

---

## सहकारी हौसिंग सोसायटीसाठी जमीन अक्वायर करता येणार नाही

हौसिंग सोसायटीच्या 'सभासदांच्याच फायद्यासाठी केलेले ॲक्विझिशन' 'पब्लिक पर्पज' साठी ठरत नाही, असा महत्त्वाचा निवाडा मुंबई हायकोर्टाने केला आहे. राहण्याच्या जागेच्या तुटवड्याचे निवारण होईल, एवढे कारण ॲक्विझिशनला पुरेसे नाही; जनतेला होणारा फायदा प्रत्यक्ष हवा; केवळ अप्रत्यक्ष उपयोगी नाही. मिसेस गमडिया ह्यांच्या रिट पेटिशनवरून हायकोर्टाने हा निवाडा केला.

---

## नोबेल पारितोषिक फंड

रवींद्रनाथ टागोर ह्यांना १९१३ साली नोबेल पारितोषिक मिळाले. त्याची ( १ लक्ष रु. पेक्षा ज्यास्त ) रक्कम त्यांनी एका बँकेत ठेवली, पण ती बँक बुडाली. विश्वभारतीच्या माजी विद्यार्थ्यांच्या संघाने तेवढी रक्कम उभी करण्यासाठी काही वर्षांपूर्वी एक फंड सुरू केला. त्यात २,००० रु. ची भर नुकतीच टाकण्यात आली. त्याचा चेक पंतप्रधान श्री. लालबहादुर शास्त्री ह्यांच्या हाती नुकताच देण्यात आला.

---

## बड्या कंपन्यांचे पुढारी गट

### टाटा, बिर्ला अग्रेसर

मोनॉपोलीज इन्क्वायरी कमिशनच्या अहवालाप्रमाणे, बड्या औद्योगिक गटांतील प्रमुख गट म्हणजे टाटा व बिर्ला. टाटा गटांत ५३ कंपन्या असून बिर्ला गटात १५१ कंपन्या आहेत. एकूण तत्सम सर्व कंपन्यांच्या वसूल भांडवलाशी ह्या दोन गटांतील कंपन्यांचे वसूल भांडवल ४४% आहे (ह्यात सरकारी कंपन्या व बँकिंग कंपन्या विचारात घेतलेल्या नाहीत.)

कमिशनने चौकशी केलेल्या २२५९ कंपन्यांवर ८३ बड्या गटांची सत्ता असल्याचे आढळले. त्यापैकी ७५ बड्या गटांकडे मिळून बिगर-सरकारी, बिगर-बँकिंग संस्थांच्या ४६.९% जिंदगीचा ताबा होता. टाटा गटाची जिंदगी ३८५ कोटी रु. आणि बिर्ला गटाची जिंदगी २७१ कोटी रु. होती. त्याखालोखाल मार्टिन बर्न (१४५ कोटी रु.), ए. सी. सी. (७६ कोटी रु.), थापर (६२ कोटी रु.), साहुजैन (६१ कोटी रु.), बर्ड हीलगर्स (५२ कोटी रु.), जे. के. सिंघानिया (४६ कोटी रु.), सुरजमल नगरमल (४३ कोटी रु.) असे जिंदगीचे गटवार आकडे आहेत.

---

### भारताने विकास योजनांचा चारपंचमांश खर्च स्वतःच केला

स्वातंत्र्यकाळांत भारताने स्वतःच्या आर्थिक प्रगतीसाठी मुख्यतः स्वतःचेच भांडवल पुरविले आहे, असा अमेरिकन सरकारने केलेल्या पाहणीचा निष्कर्ष आहे. मार्च १९६६ मध्ये तिसरी पंचवार्षिक योजना पुरी होईल, तेव्हा एकूण उपयोगांत आणलेल्या भांडवलपैकी चारपंचमांशाची म्हणजे १६,२०० कोटी रु. ची उभारणी भारतानेच केलेली असेल. उरलेले एकपंचमांश म्हणजे ४,३०० कोटी रु. चे भांडवल परदेशांनी पुरविलेले असेल. मार्च १९६५ अखेर वापरलेल्या परदेशी मदतीपैकी ५८% ची (३,६८८ कोटी रु. पैकी २१३८ कोटी रु. ची) मदत अमेरिकेची होती. प. जर्मनी (८.३%), ग्रेटब्रिटन (६.८%), रशिया (६.७%) असे इतर देशांच्या मदतीचे प्रमाणे आहेत. अमेरिकेच्या मदतीपैकी २२% मदत ग्रँटच्या स्वरूपाची आहे; त्याची परतफेड करावयाची नाही. ३२% मदत अल्प व्याजाच्या, ४० वर्षांत डॉलरमध्ये परत करावयाच्या कर्जाच्या स्वरूपाची आहे, आणि ४६% मदत रुपयात परत करावयाच्या कर्जाच्या स्वरूपाची आहे.

---

### इंजिनिअरिंग धंद्याने केलेली बचत

पाकिस्तानने भारतावर आक्रमण केल्यापासून इंजिनिअरिंगच्या धंद्याने पूर्वी आयात करण्यात येत असलेल्या अनेक प्रकारच्या मालाऐवजी देशी माल वापरण्यास सुरवात केली. त्यामुळे ह्या धंद्याच्या परदेशीय चलनातील खर्चात २१ कोटी रुपयांची बचत झाली आहे. अशा मालात मिश्र पोलाद, शिसे, तांबे आणि जस्त ह्यांचा समावेश आहे. गेली कित्येक वर्षे तांत्रिक विकासाचे खाते अशा प्रकारचा प्रयत्न करीत आहे. पण ह्या बाबतीत चालू वर्षी आणि त्यातही गेल्या दोनतीन महिन्यातच विशेष यश आले. पाकिस्तानच्या आक्रमणानंतर गेल्या तीन-चार महिन्यातच १०.५ कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची बचत करण्यात आली आहे. भारत सरकारचे संरक्षण खाते व मुलकी पुरवठा खाते ह्यासंबंधी जारीने प्रयत्न करीत आहे.

### धान्याचे उत्पादन वाढविलेच पाहिजे

अमेरिकेने १५० लक्ष टन गहू देऊ केला आहे; भारत भीत भीत १०० लक्ष टन गव्हाची याचना करीत होता! भारताची बंदरे एवढा गहू उतरवून कसा घेणार आणि त्या गव्हाचा साठा व वाटप ह्याची कार्यक्षम रीतीने व्यवस्था कशी होणार, हे आता प्रश्न उपस्थित झाले आहेत. भारतातील सध्याच्या दुष्काळावरील तातडीचा उपाय म्हणूनच अमेरिकेच्या ह्या मदतीकडे पाहिले पाहिजे; नेहमीचीच झालेली तूट ह्यापुढे पडू नये ह्यासाठी अंतर्गत उत्पादनवाढीकडे दक्षतेने लक्ष द्यायला हवे. आतापर्यंत ह्या प्रश्नाकडे दुर्लक्षच केले गेले, हे उघड आहे. त्याचे कारण सहज मिळत गेलेली अमेरिकेची मदत आणि शेतीच्या उत्पादनवाढीच्या प्रश्नाची गुंतागुंत, हे होय. औद्योगिक उत्पादनवाढीइतकी शेतीची उत्पादनवाढ भारतात तरी सोपी नाही आणि म्हणूनच तिच्याकडे लक्ष देणे सोपे व सत्वर फलदायी नाही. म्हणूनच, भारताने आपल्या योजनांत अन्नधान्याच्या उत्पादनास अग्रहक्क दिला पाहिजे, असे अमेरिकेने बजावले आहे.

बिगर-शेती व्यवसायात मोठ्या प्रमाणावर नागरिकांना काम मिळावयाचे असेल तर शेतकऱ्यांनी स्वतःपुरतेच केवळ नव्हे, तर शहरातील कामगारांना पुरेल एवढे उत्पादन केले पाहिजे. सर्व मोठ्या औद्योगिक राष्ट्रांचा इतिहास हेच सांगतो. उद्योगीकरणाची ती आवश्यक पायरी आहे.

---

### विमानांच्या सुट्या भागांचे उत्पादन

भारत व पाकिस्तान ह्यांच्यात झालेला रणसंग्राम २२ दिवसांतच समाप्त झाला. दीर्घकालीन म्हणजे वर्षानुवर्षे युद्ध चालविण्याची आर्थिक कुवत उभयता देशांत नव्हती व नाही असे मत जाणत्यांनी त्याच वेळी व्यक्त केले होते. भारताच्या लष्करी गरजांपैकी ८० टक्के गरजा देशातील उत्पादनानेच भागविता येत असल्या तरी विमानांच्या सुट्या भागासारख्या काही गरजा भागविण्यासाठी आयातीशिवाय दुसरा मार्गच नव्हता. युद्ध सुरू होताच दोन्ही देशांची लष्करी मदत बंद झाली. हा धडा शिकून विमानांना लागणारे सुटे भाग भारतातच तयार करण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. उत्तर प्रदेशातील १८ कारखान्यांनी भारतीय विमानदलाला लागणारे भाग तयार करण्यास सुरुवात केली आहे. त्यांनी तयार केलेल्या मालांपैकी २५ भागांचे नमुने विमानदलाच्या अधिकाऱ्यांनी पास केले आहेत.

---

### पूर्व युरोपसाठी पश्चिम युरोपकडील अणुभट्ट्या

पूर्व युरोपमधील सरकारी मालकीच्या उद्योगधंद्यांना अणुशक्तीच्या साह्याने निर्माण करण्यात आलेली वीज मिळण्याचा संभव आहे. विशेष म्हणजे शक्ती निर्माण करण्यासाठी लागणाऱ्या अणुभट्ट्या पश्चिम युरोपातील देशाकडून मिळण्याची शक्यता आहे. काही वर्षांपूर्वी पूर्व युरोपातील देशांनी पश्चिमेकडील देशांकडून अशा भट्ट्या मिळविण्याचा प्रयत्न केला. परंतु सोव्हिएट राष्ट्रगटातील देशांना लष्करी उपयोगासाठी वापरण्यासारखे साहित्य विकण्यास बंदी असल्याने ते जमले नाही. अजूनही अणुभट्टी पुरविण्यावर बंदी आहेच. तथापि अशी अणुभट्टी विकत घेण्याची परवानगी रुमेनिआने ब्रिटन, अमेरिका व फ्रान्सकडे मागितल्यापासून परिस्थितीत बदल झाला आहे. लष्करी महत्त्वाच्या मालाच्या व्यापारावर नियंत्रण ठेवणारी पश्चिम युरोपातील १५ देशांची कमिटी ह्या व्यापारी देवघेवीकडे अधिक सहानुभूतीने पाहील असा अंदाज आहे.

मंजूर करणे जरूर होते. आता गाळपशक्ती आणखी वाढवून मिळण्याबद्दल पुनः योग्य वेळी अर्ज करण्याचा आमचा इरादा आहे. चालू कारखान्यांच्या उत्पादनशक्तीत वाढ करणे कमी खर्चाचे असते. शिवाय जॉइंट स्टॉक व सहकारी या दोन्ही क्षेत्रांतील कारखाने हे देशाच्या औद्योगीकरणासाठी अवलंबिण्यात आलेल्या संमिश्र अर्थव्यवस्थेच्या राष्ट्रीय धोरणाचाच भाग आहेत.

साखर स्वस्त दरात उपलब्ध कशी होईल हे पाहणे हे सेन कमिशनचे उद्दिष्ट होते. जेव्हा उसाखालील सध्याच्या क्षेत्रात २५ टक्के कपात करण्याचे धोरण आहे व उसासाठी अधिक क्षेत्र उपलब्ध होणे शक्य नाही, तेव्हा हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी दर एकरी उसाचे अधिक पीक काढणे हाच एक उपाय आहे. पण त्यासाठी उसाच्या दर एकरी प्रमाणात व गुणात भरीव वाढ होणे जरूर आहे. "साखर शेतात पिकते" असे म्हणणे म्हणजे निव्वळ एक उक्ती नाही. साखरेच्या धंद्यातील ते मूलभूत सत्य आहे.

दक्षिण अमेरिका व आफ्रिका या देशांतून अधिकाधिक साखर निर्यात होत आहे आणि आपल्या देशातील साखर निर्मितीचा खर्च कमी होऊन कमी किमतीस साखर विकणे आपणास शक्य झाल्याखेरीज जागतिक बाजारपेठेत साखर निर्यातीबाबत जोराची हालचाल करणे आपल्या देशास शक्य होणार नाही. तथापि, माझ्या मते, परकीय चलन मिळविण्यासाठी सबसिडीच्या रूपाने काहीही खर्च आला तरी आपल्याला साखरेची निर्यात चालू ठेवणे भाग आहे.

अहवालाच्या सालचे आपल्या कंपनीचे हिशेब पाहता, आर्थिक दृष्ट्या हे वर्ष तितकेसे समाधानकारक गेलेले नाही असे म्हणावे लागेल. उत्पादन खर्चात झालेली वाढ सोडली तरी खर्चाची दुसरी प्रमुख बाब म्हणजे शेतकऱ्याकडून घेतलेल्या उसावर द्यावी लागलेली तोडणी, वाहतूक व ऑक्ट्रॉय ड्यूटीची रक्कम ही होय. हा खर्च सुमारे २५ लक्ष रुपये झाला.

उसाची किंमत जर एक्स–फील्ड पद्धतीने दिली तर आपल्या कारखान्याच्या नफ्यावर त्याचा मोठाच अनिष्ट परिणाम होणार असून, टॅरिफ कमिशनने ठरवून दिलेला १२ टक्के हा वाजवी नफाही मिळू शकणार नाही.

आपल्या कारखान्यास ऊस पुरवठा करणाऱ्या शेतकरी वर्गाच्या नावाखाली, उसाची किंमत एक्स–फील्ड पद्धतीने दिली जावी अशी मागणी अलीकडे केली जात आहे, हे आपणास माहीत असेल. केंद्र सरकारने कारखान्यात आणून घालण्याच्या (फॅक्टरी डिलिव्हरी) उसाचा दर ठरवून दिलेला असून, तो दर व उत्पादन खर्च, साखरेचा उतारा आणि वाजवी नफ्याचे प्रमाण व सरकारी कर हिशेबात धरूनच साखर विक्रीचा दर सरकार ठरवून देते. देशातील निरनिराळ्या प्रदेशात, उसातील साखरेच्या उताऱ्याचे प्रमाण निरनिराळे आहे हे आपण जाणताच. ज्या विभागात साखरेच्या उताऱ्याचे प्रमाण कमी आहे त्या विभागासाठी सरकारने साखरेचा दर वाढवून दिलेला आहे. कारण त्या विभागात एक पोते साखर तयार करण्यासाठी इतर विभागापेक्षा अधिक उस लागतो. साखरेच्या किमतीचा तक्ता पाहिला तर त्यातील प्रत्येक बाब, अगदी कच्च्या मालापासून म्हणजे उसाच्या किमतीपासून तो साखर विक्रीच्या दरापर्यंत प्रत्येक गोष्ट सरकारने नियंत्रित केलेली आहे. अशा परिस्थितीत साखरेची किंमत ही उसाच्या फॅक्टरी–डिलिव्हरी दरावर आधारूनच ठरविली जात असताना, एक्स–फील्ड पद्धतीने उसासाठी अधिक दर देण्यास वाव नाही हे उघड आहे.

सन १९६४–६५ साली कोल्हापूर भागात गुळाचे भाव फार तेजीत राहिले आणि ज्या शेतकऱ्यांनी आपल्या कारखान्यास ऊस देण्याचे करार केले होते त्यांच्यापुढे आपल्या उसाचा गूळ करणाऱ्या इतर शेतकऱ्यांशी तुलना करता, मोठीच अडचणीची परिस्थिती उभी राहिली. गुळाच्या भावातील तेजीमुळे कारखान्यास ऊस देण्यापेक्षा त्याचा गूळ करण्याकडेच शेतकऱ्यांचा कल होता. उलट, देशात साखरेचा तुटवडा असल्यामुळे केंद्र सरकार साखर उत्पादन वाढविण्यावर भर देत होते. या सर्व गोष्टींचा विचार करून आणि राज्याचे नामदार शेतकी मंत्री व उपमंत्री यांच्या सूचनेवरून आम्ही गेल्या वर्षी उसाची तोडणी, वाहतूक व ऑक्ट्रॉय ड्यूटी याचा खर्च सोसण्याचे मान्य केले. पण ही मान्यता त्या एका वर्षापुरतीच होती. हा जादा खर्च प्रत्येक वर्षी सोसणे कारखान्यास शक्य नाही. चालू वर्षी गुळाचे भाव खूपच घसरले आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातील उसाच्या क्षेत्रात खूपच वाढ झालेली आहे; आणि गुऱ्हाळाचा वाढता खर्च व गुळाचे घसरलेले दर यांचा विचार करून शेतकरी वर्ग गुऱ्हाळ करण्याऐवजी कारखान्यास ऊस देण्यास जास्त उत्सुक आहे. अशी वस्तुस्थिती असून देखील, आमच्या कारखान्यास ऊस पुरविणाऱ्या शेतकऱ्यांच्या नावावर पुन्हा एक्स–फील्ड दर देण्याचीच चळवळ चालू आहे याचे मोठे आश्चर्य वाटते.

उसाचा दर एक्स–फील्ड दिला जावा अशी मागणी करणाऱ्यांचे म्हणणे असे आहे की, जर सहकारी साखर कारखाने उसाची किंमत एक्स–फील्ड देऊ शकतात तर कोल्हापूर शुगर मिल्सने तो का देऊ नये? सहकारी साखर कारखाने आपल्या सभासदांच्या उसाला एक दर आणि बिगर सभासदांना दुसराच दर देतात ही गोष्ट मला स्पष्ट करावयाची आहे. सहकारी संस्थांना पुष्कळ सोई–सवलती मिळत असून, या सवलती जॉइंट–स्टॉक कारखान्यांना मिळत नाहीत. त्यांना मिळणाऱ्या उसाचे क्षेत्रही त्यांच्या कारखान्याच्या निकट परिसरातच असते. उलटपक्षी आमच्या कारखान्यास बराच उस ३० मैलांहून अधिक अंतरावरून आणावा लागतो व काही ऊस तर ४० मैलांपेक्षाही जास्त अंतरावरून येतो.

ज्यांच्या ठायी प्रभावी कर्तृत्वशक्ती, दूरदृष्टी, अंगीकृत कार्याविषयीची इतरत्र क्वचित आढळणारी निःसीम निष्ठा, सूक्ष्म निरीक्षणशक्ती व मती कुंठित करणाऱ्या प्रसंगी दिसून येणारे चातुर्य व कौशल्य वगैरे अनेक गुणांचा सुंदर समन्वय झालेला आहे व ज्यांच्या अंगी कोणत्याही कठीण प्रसंगी समतोल व शांत वृत्तीने अचूक निर्णय घेण्याचे दुर्मिळ कौशल्य आहे, असे आपल्या कारखान्याचे कर्तबगार जनरल मॅनेजर, श्री. एम. बी. लोहिया यांच्या असाधारण कार्यक्षमतेबद्दल मला स्वतःला व संचालक मंडळाला संपूर्ण समाधान व अभिमान वाटतो. हे नमूद करताना आपण सर्व माझ्याशी सहमतच व्हाल यात मला शंका वाटत नाही. अनेकविध शाखांनी विस्तार पावत असलेल्या या आपल्या कारखान्याच्या विविध कार्याची धुरा वाहण्याची जबाबदारी ते उत्तम तऱ्हेने पार पाडत आहेत. त्याचप्रमाणे त्यांच्या सहकारी अधिकारी वर्गानेही त्यांना जे सतत व निष्ठापूर्वक सहकार्य दिले त्याबद्दलही आम्हांला अतिशय आनंद वाटतो.

(मूळ इंग्रजी भाषणावरून.)

# दि कोल्हापूर शुगर मिल्स लि., कोल्हापूर.

## ३२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील,

## चेअरमन श्री. रामनिवास रामनारायण रुईया यांच्या भाषणाचा गोषवारा

अहवालाच्या साली साखरेचे उत्पादन ३,५९,७४० क्विंटल पोती झाले, गत साली ते ३,३९,९८० क्विंटल पोती होते. या वर्षी साखरेचा उतारा १२.६३ टक्के होता तर गेल्या साली तो १२.००६ टक्के इतका होता. गेल्या हंगामात पहिल्या मिल टर्बाइनच्या नादुरुस्तीमुळे पडलेला थोडा खंड सोडला तर एकंदरीत दररोजच्या गाळपाचे पूर्वीचे प्रमाण कायम राहिले.

अहवालाचे साली डिस्टिलरीचे काम ५२ दिवस बंद ठेवणे भाग पडले हे नमूद करण्यास खेद वाटतो. स्पिरिटला भरपूर मागणी असूनही आमच्या नेहमीच्या ग्राहकांना आमच्या मालाच्या खरेदीचे परवाने न देता त्यांना दुसरीकडे पाठविण्यात आले. शिवाय ज्यांना आमचा माल खरेदी करण्याचे परवाने देण्यात आले त्यापैकी काही ग्राहक त्यांना ठरवून दिलेला मालाचा कोटा घेऊ शकले नाहीत. परिणामी डिस्टिलरी बंद ठेवणे भाग पडले. त्यामुळे निव्वळ आपल्या मिलचेच नुकसान झाले असे नाही तर देशातील आजचा अल्कोहोलचा तुटवडा लक्षात घेता हे राष्ट्राचेच नुकसान झाले असे म्हणावे लागेल.

आपल्या ॲसेटिक ॲसिडच्या कारखान्यात यंदा २०५.८७ मेट्रिक टन ॲसिडचे उत्पादन झाले. परंतु नवीन कारखाना सुरळीत चालू होताना सुरुवातीला येणाऱ्या अडचणी याही कारखान्याच्या बाबतीत अनुभवास आल्या. तथापि त्यांचे निवारण करून कारखान्याचे काम जोमात चालू होण्यासाठी सर्व प्रयत्न केले जात आहेत. ब्युट्रिल ॲसिटेटचा कारखाना आता लवकरच सुरू होण्याच्या मार्गावर आहे.

परदेशी मदिरानिर्मिती, कार्बन डायॉक्साईड गॅसचे उत्पादन व ब्रुअरी याबाबतचे प्राथमिक कामकाज चालू आहे.

'महाराष्ट्र स्टेट फार्मिंग कॉर्पोरेशन' कडे सुपूर्त झालेल्या जमिनी, बंधारे, ड्रेन्स, विहिरी वगैरेच्या भरपाईबद्दल कंपनीने केलेल्या मागणीचा उल्लेख डायरेक्टर्स यांच्या अहवालात आला आहे. भरपाईचे क्लेम्स मंजूर होण्याचे कामी अवास्तव वेळ लागत आहे असे म्हणणे भाग आहे. आमच्याकडून शक्य ते सर्व सहकार्य देण्याच्या सद्धेतूने आम्ही कसलीही तक्रार न करता आमच्या जमिनी दि महाराष्ट्र स्टेट फार्मिंग कॉर्पोरेशनकडे सुपूर्त केल्या; परंतु उलट कॉर्पोरेशनकडून मात्र असे सहकार्य आम्हास मिळत नाही, असे खेदपूर्वक म्हणणे भाग आहे. सरकारने आमची चालू असलेली पाणीपुरवठा योजना आपल्याकडे घेतलेली नाही, आणि आम्ही कॉर्पोरेशनच्या पिकास पाणी देत आहोत. त्यांच्या पिकास आम्ही दिलेल्या पाण्याचे त्यांनी देणे असलेले पैसे तर त्यांनी दिलेले नाहीतच, पण त्यांनी पुरविलेल्या उसाचे पैसे मात्र त्यांना तावडतोब हवे आहेत. अन्यथा, उपाययोजनेचा धाक कॉर्पोरेशन देत आहे. ही गोष्ट विस्मयजनक आहे.

केन्द्र सरकारने नेमलेल्या सेन समितीने आपला अहवाल सरकारला सादर केल्याचे आपणास विदित असेल. साखरधंद्याबाबतच्या सरकारच्या अर्धवट धोरणामुळे कधी जादा उत्पादन तर कधी अपुरे उत्पादन अशा आपत्तींचे फेरे चालू राहिले, अशी टीका समितीने केली असून, आपल्या अहवालात केलेल्या शिफारशी 'एकजिनसी' पणे स्वीकारल्या जाव्यात, असा या समितीचा आग्रह आहे. उसाच्या किमतीत घट झाली पाहिजे असे समितीचे म्हणणे आहे. १९६५-६६ च्या हंगामात ३५ लक्ष टन साखर उत्पादन होईल असा त्यांचा अंदाज असून, त्यानुसार ७ लाख टन इतका राखीव साठा ठेवून पुढील वर्षापासून साखरेवरील नियंत्रण दूर करावे अशी समितीची शिफारस आहे. तथापि, यंदा पावसाने दिलेल्या धोक्यामुळे देशाच्या उत्तर व दक्षिण दोन्ही विभागांत दर एकरी उसाच्या उत्पादनात व साखरेच्या उताऱ्यात घट झाली आहे. साखरधंद्याचे भवितव्य मुख्यतः निसर्गावर अवलंबून असते. म्हणूनच आता अशा परिस्थितीत साखरेवरील नियंत्रणे उठविल्यास साखर कारखाने आर्थिक अडचणीत येण्याचा धोका आहे. उसाचे वाढलेले दर, मजुरी व महागाईभत्ता यांमध्ये झालेली वाढ, रिझर्व्ह बँकेचा पैसा 'महाग' करण्याच्या धोरणामुळे व्याजाच्या दरात झालेली वाढ आणि इतर कच्च्या मालाच्या चढलेल्या किमती या सर्व चढत्या भाजणीमुळे साखरेच्या उत्पादनखर्चात झालेली एकंदरीत वाढ विचारात घेता, साखरेच्या विक्रीच्या किंमतीत योग्य वाढ करण्याची आवश्यकता सेन कमिशनने विचारात घेतली नाही, ही गोष्ट योग्य वाटत नाही. कमिशनने तयार केलेल्या किमतीचा आराखडा वस्तुस्थितीला धरून नाही. साखरधंद्यासाठी दुसरी 'वेतन समिती' (वेज बोर्ड) नेमण्यात आले असून, नोकरवर्गास द्यावयाच्या वेतनात काही तरी वाढ होणार हे अपेक्षित आहे. सेन कमिशनने उत्पादनाच्या २० टक्के इतका राखीव साठा सरकारसाठी शिल्लक ठेवण्याचे सुचविलेले बंधन साखरधंद्याला असेच आणखी अडचणीत टाकणारे आहे. साखरेच्या किमतीबाबतची सारी विचारसरणीच वस्तुस्थितीला सोडून आहे व साखरेची सध्याची ठरविण्यात आलेली किंमतही फायदेशीर नाही.

साखर कारखान्यास पुरेसा उसाचा निश्चित पुरवठा होण्याच्या दृष्टीने ऊस क्षेत्राचे विभाग ठरवून देण्याच्या कामीही अवास्तव दिरंगाई चालली आहे. या बाबतीत सहकारी साखर कारखान्यांची सोय पाहण्याच्या प्रयत्नात जॉईंट स्टॉक साखर कारखान्यांची गैरसोय केली जाईल अशी भीती वाटते. मला या ठिकाणी पुन्हा एकदा एक गोष्ट स्पष्ट करावीशी वाटते ती म्हणजे एखादा कारखाना, मग तो जॉईंट स्टॉक असो, किंवा सहकारी असो, दोन्हीही राष्ट्राच्या उद्योगधंद्याचाच एक भाग असतात, आणि म्हणूनच या दोन्हीही विभागांतील कारखान्यांना योग्य तो न्याय मिळाला पाहिजे.

या विषयासंबंधी बोलताना मला कारखान्याची उत्पादनशक्ती वाढविण्याच्या बाबतीतील सरकारी धोरणाचाही उल्लेख केला पाहिजे. आमच्या कारखान्याची १७०० टनांची अधिकृत गाळपशक्ती २२०० टनांपर्यंत सरकारने वाढवून दिली आहे. परंतु आमच्या कारखान्याने प्रत्यक्षात २५००-२६०० टन गाळपाची गाठलेली मर्यादा व ऊस मिळण्याची शक्यता या गोष्टी विचारात घेऊन आपल्या कारखान्यास सरकारने किमान २६०० टनांची गाळपशक्ती

# श्री. वा. पुं. वर्दे

## यशस्वी नेतृत्वाचे रहस्य

श्री. वामन पुंडलिक वर्दे हे आर्थिक, औद्योगिक, बँकिंग व सहकारी क्षेत्रांतील दूरदृष्टीचे, कळकळीचे तज्ज्ञ कार्यकर्ते आहेत. त्यांनी कित्येक नव्या संस्था स्थापन करण्यात पुढाकार घेतला; कित्येकांच्या पुनरुज्जीवनास व पुनर्रचनेस हातभार लावला. कितीतरी संस्थांच्या आजच्या श्रेष्ठ स्थानास त्यांचे मार्गदर्शन कारणीभूत झालेले आहे. आपल्या सार्वजनिक सेवेचा प्रारंभ श्री. वामनराव ह्यांनी सारस्वत को. बँकेत केला. तिचे संगोपन व संवर्धन केले; आपली ध्येये, विचार आणि वृत्ती तिच्या जीवनाशी संलग्न करून बँकेला आजचे यशोवैभव प्राप्त करून दिले. बँक ऑफ महाराष्ट्र लि. ह्या संस्थेच्या बाबतीतही त्यांची कामगिरी ह्याच प्रकारची आहे. श्रीदत्तजयंती, मार्गशीर्ष शुद्ध पौर्णिमा शके १८८७ (८ डिसेंबर, १९६५) ह्या त्यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त आम्ही त्यांचे व्यक्तित्व आणि कार्यपद्धती ह्यासंबंधी परिचितांचे लेख प्रसिद्ध करीत आहो. त्यावरून लहान-मोठ्या संस्थांच्या द्वारा आर्थिक व औद्योगिक कार्यक्षेत्रात काम करणाऱ्यांना बहुमोल मार्गदर्शन लाभेल, अशी खात्री आहे. ह्या प्रसंगी आम्ही श्री. वामनराव ह्यांना दीर्घायुष्य व आरोग्य चिंतितो.

श्रीयुत वर्दे यांच्याबरोबर कार्य करण्यात आम्हा त्यांच्या सहकाऱ्यांना आनंद वाटतो. आपल्या सहकाऱ्यांना नेतृत्व आणि मार्गदर्शन करणे आणि प्रसंगी सहकाऱ्यांच्या विचारांना अग्रमान देणे, याचा सुंदर समन्वय ते सतत साधतात. नेत्याला लागणारे निश्चयीपणा आणि संबीरपणा हे गुण त्यांच्या अंगी आहेतच, पण या गुणांचा वापर ते इतक्या कौशल्याने करतात की त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे दडपण आम्हा त्यांच्या सहकाऱ्यांना कधीच भासले नाही.

श्रीयुत वामनराव वर्दे, बँकेचे तीस वर्षे अध्यक्ष होते. या सर्व कालात बँकेची सेवा त्यांनी अत्यंत निरलस आणि निःस्वार्थी वृत्तीने केली आणि त्यांचे आता वयोमान झाले असले तरी त्यांची मानसकन्या सारस्वत बँक आता संबीरपणे यशोमार्गाकडे जात आहे, या जाणीवेने त्यांना खचित धन्यता आणि कृतार्थता वाटेल. आम्ही त्यांचे सहकारी त्यांचाच वारसा पुढे चालविणार आहोत.

वामनराव यांनी जवळ जवळ तीन तपे सहकार, उद्यम, व्यापार आणि शिक्षणविषयक स्वकीय आणि अन्य संस्थांतून स्पृहणीय कार्य केले आहे. या सर्व संस्थांतील त्यांचे सहकारी या सत्कारसमारंभात सहभागी आहेत. श्री. वामनरावांचे विचार आणि अनुभव हीच आमची शक्ती आणि सामर्थ्य आहेत. म्हणून वयोमानामुळे ते बँकेचे अध्यक्ष म्हणून निवृत्त झाले तरीही बँकेच्या व्यवस्थापक मंडळावरील त्यांचे सहकारी, बँकेतील सर्व श्रेणीतील कर्मचारी व इतर संस्थांतील सहकारी, आम्ही सर्व, अपत्यभावनेने त्यांच्या चरणी अर्पू इच्छितो, "धन्यवाद, वामनराव, त्रिवार धन्यवाद !"

—वसंत पंडित

श्री. वर्दे यांजबरोबर सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, टेंपल ट्रस्ट आणि चिकित्सक समूह यांच्या कार्यकारी मंडळावर कार्य करण्याची मला संधि मिळाली आहे. त्यामुळे त्यांच्या कार्य-वैशिष्ट्यांची थोडी माहिती मला झाली आहे.

श्री. वर्दे हे अत्यंत वक्तशीर आहेत आणि सभेच्या कार्यक्रम-पत्रिकेवर कितीही कामे असोत; ती सर्व त्याच सभेत संपवावी असा त्यांचा कटाक्ष असतो. बँकेच्या व्यवस्थापक मंडळाच्या सभा दर गुरुवारी ठीक ६–३० वाजता सुरू होतात आणि पुष्कळ वेळा रात्री ९ ते ९–३० पर्यंत चालतात. बोर्डरूममधील घड्याळ अध्यक्षांच्या खुर्चीच्या उजव्या हाताला आहे, ते श्री. वर्दे यांना दिसत नसावे म्हणून ते समोरच्या भिंतीवर लावावे अशा सूचना अधीर सभासद आपसात करतात; एकाने तर घड्याळाऐवजी कॅलेंडर लावावे असेही सुचविले !

श्री. वर्दे अत्यंत निःस्पृह आहेत. नाही म्हणण्याचे मनोधैर्य त्यांच्या अंगी आहे. तसेच नियमांवर आणि लोकशाही पद्धतीवर त्यांची विलक्षण श्रद्धा आहे. बँकेच्या त्रैमासिक सभला उपस्थिती कमी असली तरीही या सभांमुळे व्य. मंडळाच्या जबाबदारीची जाणीव कायम राहते असे ते मानतात. ज्या धर्मार्थ संस्थेचा वार्षिक वृत्तांत आणि हिशेब वेळेवर मंजूर करून घेतले नाहीत, त्या संस्थांना बँकेकडून देणगी वा साहाय्य मिळणार नाही हे निश्चित समजावे. ह्या बाबतीत ते निकट मित्राचाही मुलाहिजा ठेवीत नाहीत.

कार्डिनल न्यूमन याने सज्जनांचे गुणविशेष खालीलप्रमाणे वर्णन केले आहेत, ते श्री. वामनराव वर्दे यांना लागू पडतात. "He has no ears for slander or gossip. He is never mean or little in his disputes, never takes unfair advantage. He knows and believes in the maxim that one must conduct oneself to his opponent as if he were one day to be a friend. He may be right or wrong in his opinion but he is too clear headed to be unjust".

ॐ शं नो देवा विश्वदेवा भवन्तु शं सरस्वती सह धीभिरस्तु ।

—लक्ष्मीकांत गंगाधर खेडेकर

बँकिंग व्यवसायात श्री. वर्दे हे साहसप्रिय नाहीत, सनातनी विचारांचे आहेत, असा क्वचित प्रसंगी दोषारोप करण्यात येत असतो. तथापि ठेवीदारांच्या पैशांचे आपण विश्वस्त आहोत ही भूमिका ते सदैव बाळगतात आणि इतरांच्या पैशांचा खेळखंडोबा कधी करीत नाहीत. तरीही सामान्य माणसांच्या आर्थिक गरजा कशा भागवाव्या याविषयी ते निरनिराळ्या योजना स्वतःहोऊन आखत असतात. उद्योगधंद्यात प्रवेश करू इच्छिणाऱ्या सर्वांना ते आपले साहाय्यकर्ते वाटतात. तथापि कोणत्याही नवीन उपक्रमातील अडीअडचणी, यशाची शक्यता आणि विशेषतः त्यात प्रवेश करू इच्छिणाऱ्या व्यक्तीची कर्तबगारी आणि मातब्बरी याची अत्यंत कसोशीने परीक्षा करतात. यामुळे त्यांचे साहाय्य लाभलेल्या प्रत्येक उद्योगधंद्याची प्रगती होण्याची निश्चिती असते. शेअर बाजारांतील त्यांचे स्थान आणि आर्थिक क्षेत्रातील त्यांचे ज्ञान व अनुभव यांचा फायदा महाराष्ट्रातील आज अनेक ख्यातनाम झालेल्या कित्येक उद्योगधंद्यांना झाला आहे.

श्री. वर्दे यांचे सखोल ज्ञान, प्रदीर्घ अनुभव, कर्तृत्व आणि विशेषेकरून त्यांचे चारित्र्य आणि सचोटी या त्यांच्या गुणांनी महाराष्ट्राच्या आर्थिक क्षेत्रातील एक मातब्बर सल्लागार हे स्थान त्यांना प्राप्त झाले आहे. कित्येक उद्योगधंदे, कारखाने आणि सहकारी बँका यांचे अधिकारी अडचणीच्या प्रसंगी श्री. वर्दे

बाजकडेच जातात आणि श्री. वर्दे यांनीही आपुलकीने या सर्वांना पुनरपि स्थैर्य आणि सामर्थ्य प्राप्त करून देण्यासाठी अनुपम साहाय्य केले आहे. असले काम जिकीरीचे असते; त्यात दुवा मिळण्याचा संभव कमीच हे माहीत असूनही श्री. वर्दे यांनी अशी बिकट कामे स्वीकारण्यात आणि ती यशस्वी करण्यात कसूर केली नाही.

श्री. वर्दे यांच्या सार्वजनिक जीवनातील यशाचा मोठा वाटा त्यांच्या सहधर्मचारिणी श्री. सौ. सुमतिबाई वर्दे यांच्याकडे जातो. इतक्या विविध व्यवसायांतील व्यग्रतेमुळे श्री. वर्दे यांना घरगुती कामासाठी वेळही मिळत नाही. त्यांच्या घरीही कारखानदार, धंदेवाईक, सार्वजनिक कार्यकर्ते यांची सल्ल्यासाठी आणि साहाय्यासाठी रीघ लागलेली असते. या सर्वांचे हसतमुखाने सौ. सुमतिबाई आतिथ्य करतात. हे सर्व करीत असताही चित्रकला, लेखणी करणे व शिकविणे, हा आपला कलात्मक संसारही त्यांनी उभारला आहे. 'परस्परं तुल्यगुणं वधूवरम्' अशी ही पतिपत्नी आहेत. श्रीयुत वामनराव वर्दे यांना दीर्घ आयुरारोग्य प्राप्त होवो आणि त्यांच्या हातून इतउत्तरही महाराष्ट्राच्या आर्थिक, सहकारी आणि सामाजिक जीवनात सेवा घडत राहो अशी सदिच्छा त्यांच्या असंख्य चाहत्यांतर्फे मी प्रदर्शित करतो.

—माधव शां. भांडारकर

शिस्त, एकोपा, अल्पउत्पन्नाच्या लोकांविषयी आस्था व निष्ठा ही वामनरावांच्या जीवनातील मूल्ये आहेत. त्यांचे पालन करण्यामध्ये त्यांनी गेली ४५ वर्षे संस्थेच्या सेवेमध्ये घालवून सारस्वत बँक ही अखिल भारतात एक आदर्श नागरी सहकारी बँक म्हणून प्रत्ययास आणली आहे.

बँकिंगच्या व्यवसायात शिस्तीची अतिशय आवश्यकता आहे. लोकांनी आपल्या ठेवी व्यवस्थापक मंडळाच्या हवाली केलेल्या असतात. त्या ठेवीचा विनियोग पूर्ण सुरक्षितता राखून सभासदांच्या आर्थिक गरजा भागविण्याकडे मुख्यत: केला जातो. व्यवस्थापक मंडळाचे अध्यक्ष हे बँकेचे प्रमुख असल्याकारणाने ते जशी शिस्त लावतील त्याप्रमाणे ती शिस्त सर्व थरांमध्ये पसरते. वामनरावांच्या भाषेत सांगावयाचे म्हणजे बँकेच्या व्यवस्थापक मंडळातील सभासदांना काही विशिष्ट पथ्ये पाळावी लागतात.

पहिले पथ्य म्हणजे व्यवहारशुचिता. आपले व्यवहार अत्यंत प्रामाणिकपणाच्या पातळीवर असले पाहिजेत. हा गुण विशेषत: बँकिंगच्या धंद्याचे दिग्दर्शन करणाऱ्यांमध्ये प्रामुख्याने असला पाहिजे; कारण बँकेचे अस्तित्वच लोकांचा विश्वास संपादन करण्यात मिळविलेल्या यशावरच आहे.

दुसरे पथ्य म्हणजे बँकेचे हिशोब चोख व दररोज तयार पाहिजेत. बँकेच्या व्यवहाराचा आढावा दररोज घेतला जातो. त्यामुळे बँकेची ३० जून वर्षअखेर परिस्थिती १ जुलै रोजी तयार असते. ही प्रथा सारस्वत बँक कसोशीने पाळत आली आहे. याचे कारण वामनरावांनी घालून दिलेली शिस्त.

तिसरे पथ्य म्हणजे बँकेचे व्यवहार पूर्ण समजावून घेणे व कुठल्याही पत्रावर सही करण्यापूर्वी ते नीट वाचून पाहणे. वामनराव कुठल्याही कोऱ्या कागदावर सही देणार नाहीत.

एकोपा हा सहकारी चळवळीचा खरा आत्मा आहे. पण फारच थोड्या सहकारी संस्थांमध्ये तो आढळून येतो. सारस्वत बँकेच्या प्रगतीचे मुख्य कारण म्हणजे वामनरावांनी ४५ वर्षे बँकेच्या वेळोवेळी असलेल्या व्यवस्थापक मंडळात त्याचप्रमाणे कर्मचारी वर्गात एकोपा राखला. प्रत्येकाला आपले मत प्रतिपादन करण्याचा हक्क त्यांनी मान्य केला. पण शेवटचा निर्णय घ्यावयाच्या वेळी तो सर्वानुमते संमत झाल्याशिवाय अंमलात आणावयाचा नाही हे जणू काही त्यांनी व्रतच घेतले आहे. मते घेण्याची पद्धत सारस्वत बँकेत मुळीच प्रचलित नाही. त्यामुळे बँकेत राजकारणाला कधीही वाव मिळाला नाही. व्यवस्थापक मंडळाच्या सभेत आपापसात कितीही मतभेद असले तरी ते सभा संपल्यावर विसरून जावयाचे व खेळीमेळीचे वातावरण ठेवावयाचे.

सहकारी चळवळीचा खरा उद्देश म्हणजे अल्प उत्पन्नाच्या माणसांच्या आर्थिक गरजा भागवून त्यांना कार्यक्षम करावयाचे. सारस्वत बँकेचा आतापर्यंतचा इतिहास पाहिला तर या गोष्टीकडे प्रामुख्याने लक्ष दिले जाते. बँकेचे खेळते भांडवल आता रु. ५ कोटींच्या आसपास आलेले आहे, तरीसुद्धा ठेवींचा उपयोग प्रामुख्याने मध्यमवर्गीय व अल्प उत्पन्नाच्या माणसांच्या मूलभूत आर्थिक गरजा—अन्न, वस्त्र व आसरा—या भागवून त्यांचे आर्थिक आरोग्य निकोप राखावयाचे ही भूमिका वामनराव व्यवस्थापक मंडळाच्या पुढे नेहमी ठेवीत असतात. नागरी सहकारी बँकेचा उद्देश नफा मिळविणे नसून ग्राहकांची सेवा करणे हा आहे. ३० जून, १९६५ अखेरचा अहवाल पाहिल्यास असे दिसून येईल की १४५३ कर्जाचे अर्जांपैकी ९५७अर्ज वरील मूलभूत आर्थिक गरजांसाठी मंजूर झालेले आहेत.

सारस्वत बँकेने गेल्या ४५ वर्षात अनेक व्यक्ती, कुटुंबे व संस्था यांना वेळोवेळी योग्य व आवश्यक आर्थिक मदत देऊन त्यांचा पुढील मार्ग उज्ज्वल व प्रगतिपथावर आणून दिला आहे. पण त्यामागची प्रेरकशक्ती वामनराव आहे, हे मी माझ्या गेली २९ वर्षे बँकेशी संबंध असल्याकारणाने अभिमानाने सांगू शकतो. डबघाईस आलेल्या सहकारी संस्थांचे पुनर्जीवन करणे हे त्यांचे जणू काय कर्तव्यच होऊन बसले होते. त्यांना योग्य व कार्यक्षम असा सल्ला देऊन त्यांनी असंख्य ठेवीदारांचे धन्यवाद मिळविले आहेत.

वामनरावांना सारस्वत बँकेबद्दल वाटणारी निष्ठा त्यांनी १९२१ ते १९६५ पर्यंत केलेली ४५ वर्षांची अविरत सेवा ह्यामध्ये प्रतिबिंबित होते. बँकिंग संस्थेचे संगोपन—लालनपालन, संवर्धन ही एक अतिशय नाजूक जबाबदारी आहे. ही कामगिरी त्यांनी अत्यंत कुशलतेने व आत्मीयतेने पार पाडली आहे. याचे प्रतीक म्हणजे सारस्वत बँकेचे भारतातील नागरी सहकारी बँकांमध्ये प्रथम स्थान हे होय.

सारस्वत बँकेशी माझा गेली २९ वर्षे संबंध आहे. अर्थात या काळात वामनरावांच्या शिस्तीखाली वाढलेला मी एक नम्र शिष्य आहे हे नमूद करण्यास मला अत्यंत अभिमान वाटतो. वामनरावांनी तयार केलेला शिष्यवृंद व्यापारी व औद्योगिक क्षेत्रात मानमरातबीने कार्य करीत आहे. माझा या बँकेशी संबंध आल्यापासून मी त्यांना गुरू मानीत आलो आहे व त्यांच्यापुढे माझे मस्तक नम्रतेने नेहमी खालीच नमणार व तेथे माझे कर जुळणार!

श्रीदत्तजयंती मार्गशीर्ष शुद्ध पौर्णिमा हा त्यांचा वाढदिवस. या शुभतिथीला त्यांच्याकडून प्रेमाचा आशीर्वाद मिळावा हीच गुरूपाशी प्रार्थना.

गुरुवर्य वामनराव यांना उदंड आयुष्य लाभून त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ सारस्वत बँकेला व त्यांच्या असंख्य शिष्यवृंदाला असाच मिळत जावा हीच श्रीदत्तगुरुंशी प्रार्थना!

जीवेत शरदः शतम्॥

—शं. वि. संझगिरी

औद्योगिक क्षेत्रांत वर्देंनी विविध प्रकारच्या व विविध ठिकाणच्या धंद्यांत लक्ष घातले आहे. यापैकी बहुतेक कंपन्या काही ना काही माल उत्पन्न करणाऱ्या राष्ट्राच्या अतएव उत्कर्षास मदत करणाऱ्या आहेत. पैसे कमवावे एवढेच त्यांचे ध्येय नाही. ज्या कंपन्यांतून उपयोगी पदार्थांचे उत्पादन या देशात वाढेल, असल्या कारखान्यांच्या स्थापनेत त्यांनी पुढाकार घेतला आहे. त्यांच्या स्वभावाची ज्याला यत्किंचितही माहिती असेल तो ते डायरेक्टरची खुर्ची फी पुरती मुकाट्याने अडवित असत असे कधीही म्हणणार नाही. प्रत्येक प्रश्नाचा स्वतंत्र विचार करणे, आपले मत स्पष्ट सांगणे, किंबहुना आग्रहाने प्रतिपादणे, आपला दृष्टिकोन दुसऱ्याच्या नजरेस आणणे, असे त्यांचे स्वभाव विशेष आहेत.

अशा प्रकारचे आक्रमक व्यक्तिमत्त्व ज्याकडे आहे, त्याला चार जणांत मिळून मिसळून काम करणे कठीण जावे असे कोणास वाटले तर ते खरे नाही. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव असा आहे की त्यांचे विरोधकही त्यांच्याशी अखेर सहमत होतात आणि सहकार्य करतात. याच सहकार्याच्या जोरावर त्यांनी निरनिराळ्या संस्थांत यशस्वी कार्य करून दाखविले आहे. व्यापार व उद्योग या दोन क्षेत्रांत वर्दे जरी वावरत असले, तरी सामाजिक कार्याचे त्यांना वावडे नाही. सोशल सर्व्हिस लीग या नामांकित संस्थेच्या व्य. मंडळावर आज किती तरी वर्षे ते कार्य करीत आहेत. साधारणतः असे म्हणावे लागेल की त्यांनी सार्वजनिक कार्याला आरंभ ज्ञातिसंस्थांमधून केला आणि नंतर त्याची उत्क्रांती होऊन ते विस्तृत क्षेत्रात शिरले. ज्ञातिसंस्थांच्याच प्रपंचात गुरफटून ते राहिले नाहीत. हे निसर्गप्राप्तच झाले. सारस्वत ब्राह्मण संकुचित वृत्तीचे नाहीत, ते वाटेल त्या क्षेत्रात वाटेल त्या ज्ञातीच्या व धर्माच्या व्यक्तिशी मिसळून कार्य करतात; धर्मभेद, पंथभेद त्यांच्या आड येत नाहीत या सिद्धांताचे वर्दे हे उदाहरण आहे. व्यवसायात त्यांचे मित्र महाराष्ट्रीयाप्रमाणे गुर्जरही आहेत. त्यांच्या कंपन्यांच्या कार्याचा व्याप महाराष्ट्राप्रमाणे, केरळ, आंध्र वगैरे प्रांतांतही आहे आणि त्या त्या ठिकाणी त्यांनी निरनिराळ्या जातीचे मित्र जोडले आहेत.

अभ्युदयाला आवश्यक असे कित्येक कल्याण गुण वर्देंकडे आहेत. पहिला म्हणजे निरलसता. काम करावयाची दुर्दमनीय हौस. पत्ते कुटताना किंवा चकाट्या पिटताना त्यांना कोणी पाहिले नसेल. ते काहीना काही कामात मग्न असतात. थोडासा वेळ मिळाला तर त्यात सहकारी चळवळ, बँकिंग, वगैरे विषयांच्या पुस्तकांचे वाचन चालू असते. न थकता एकसारखे श्रम करावयाची तयारी हा दुसरा गुण. निरनिराळ्या कंपन्यांच्या सभांसाठी, किंवा व्यवसायांसाठी त्यांना एकसारखे फिरावे लागते पण ह्या फिरण्याचा त्यांना कंटाळा किंवा थकवा वाटत नाही. विमानाने, रेलने, बोटीने किंवा बैलगाडीने वाटेल त्या रीतीने त्यांना प्रवास करावयास कंटाळा नाही. बसल्या ठिकाणी आणि मिळेल त्या वेळी त्यांना झोप घेऊन इंद्रियांना ताजेतवाने करता येते. झोपेची तक्रार, किंवा भूक नसल्याची तक्रार किंवा प्रकृतीसंबंधी तक्रार अद्याप ऐकलेली नाही. स्वभावाचा शांतपणा. कितीही अप्रिय गोष्ट झाली तरी चिडणे, किंवा गडबड करणे त्यांच्या स्वभावास माहित नाही. शेअर बाजारात केवढीही उलथापालथ होवो, स्वतःच्या ऑफिसातले कागद गमावले जावोत, नोकरांच्या हलगर्जीपणामुळे एखाद्याकडचे येणे मुदतीबाहेर जावो किंवा स्वतःच्या मोटारला ॲक्सिडंट होऊन चक्काचूर होवो, वामनरावांच्या चेहऱ्यावरील हास्याची छटा मावळत नाही. रेल्वेची गाडी चुकली तरी तडफडाट नाही, घाई नाही, धांदल नाही. सर्व काही शांतपणे व्हायचे. यामुळे सर्व कामे व्यवस्थित होतात. त्यांना माणसांची परीक्षा चांगली आहे. त्यामुळे योग्य माणसाची निवड करून त्यावर निरनिराळ्या जबाबदाऱ्या सोपवून दिल्या म्हणजे कामे शीघ्र व तत्परतेने होतात आणि स्वतःला महत्त्वाच्या कामात लक्ष घालायला फुरसत मिळते. स्वतःचे ऑफिस काय, किंवा त्यांच्या नेतृत्वाखाली चाललेल्या संस्थांची ऑफिसे काय, त्यां सर्वांना हाच नियम लागू आहे. नोकरांवर विश्वास, त्यांच्या क्षुल्लक चुकांकडे कानाडोळा, योग्य वेळी देण्यात येत असलेली पगारवाढ यामुळे नोकरांचे सहकार्य व विश्वास त्यांनी संपादन केला आहे. आणि सहकार्याच्या जोरावर त्यांना एवढे काम करणे शक्य झाले आहे.

यातरून कोणी समजेल की वर्दे 'मऊ मेणाहूनि' अशावृत्तीचे आहेत तर ती चूक होईल. आपला मुद्दा दुसऱ्याला पटविण्यासाठी ते त्याबरोबर तासचे तास बोलतील, वादविवाद करतील, पण मुद्दा सोडणार नाहीत. शेवटी त्यांच्या मुद्द्याच्या खरेपणाविषयी खात्री न झाली तरी वादविवाद करून थकल्यामुळे विवादक त्यांचे म्हणणे कबूल करीलच करील. ते नेहमी प्रियभाषी आहेत. पण प्रसंगोपात कठोर वाक्ताडन करावयास भिडणारे नाहीत. निरनिराळे व्यवसाय करणाऱ्यास आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येकास संतुष्ट करणे शक्य ही नसते 'मृदुनि कुसुमादपि' बोलणारे कधी कधी 'वज्रादपि कठोर' होतात हे खरे आहे.

थोडक्यात सांगावयाचे म्हणजे ते स्वाभिमानी आहेत. पण अहंकारी नाहीत. त्यांना सत्तेची आवड आहे. पण त्यामुळे कोणाचे वाकडे होऊ नये अशीही प्रबल इच्छा आहे. महत्त्वकांक्षा आहे, पण तिच्या प्राप्तीसाठी निरंकुश वृत्ती नाही. वैभव पाहिजे, पण त्याचे प्रदर्शन नको. बालपणात अडचणींशी परिचय झाल्यामुळे गरीबांबद्दल सहानुभूती आहे. दुसऱ्याच्या उपयोगी पडण्याची प्रवृत्ती आहे, पण व्यवहारचातुर्यामुळे एखाद्याला नुसते पैसे देण्यापेक्षा त्याला उद्योगधंद्यास लावून त्याचे दैन्य कायमचे दूर करावे या दृष्टीने प्रयत्न होतात. जात्यभिमान आहे पण जात्यंधता नाही. वाटेल त्याबरोबर मिसळून पुन्हा आपले स्वत्त्व कायम राखण्याची धमक आहे. त्यांना विडीचेसुद्धा व्यसन नाही, ऐटदार पोषाखाची आवड नाही, खाण्यापिण्यात श्रीमंती डौल नाहीत.

वामनरावांचे कौटुंबिक सुख हेवा करण्यासारखे आहे. त्यांच्या पत्नी सौ. सुमतीबाई ललितकलांच्या भोक्त्या आहेत. सार्वजनिक कार्याची त्यांना आवड आहे. विणकाम, भरतकाम, कशिदा काढणे वगैरे कलांत त्यांचे अप्रतिम कौशल्य आहे. निरनिराळ्या प्रकारच्या बाहुल्या, जनावरे वगैरे बनविण्याचा त्यांना शोक आहे. कलेच्या वस्तू तयार करण्याइतकेच त्या करावयास शिकविण्याची त्यांना आवड आहे. सुशिल कार्यक्षम पत्नीच्या सहवासामुळे वर्दे यांची कौटुंबिक बाबींकडे पाहण्याच्या जबाबदारीतून मुक्तता झाली आहे. आणि म्हणून आपला व्यवसाय व सार्वजनिक काम यांच्यासाठी शक्य तितका जास्त वेळ त्यांना देता येतो.

—भि. सो. खवनीस

## वा. पुं. वर्दे यांच्या कार्याची व्याप्ती

### स्वकीय संस्था

१. सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड.
२. सारस्वत ब्राह्मण समाज.
३. सारस्वत दीनवत्सल संघ.
४. सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळी.
५. रा. ब. स. वि. गौ. सा. ब्रा. फॉरिन एज्युकेशन सोसायटी.
६. गौ. सा. ब्रा. टेम्पल ट्रस्ट.
७. चिकित्सक समूह.
८. गौ. सा. ब्रा. को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड.
९. दाभोळकर स्कॉलरशिप बोर्ड.
१०. मं. वि. राजाध्यक्ष चॅरिटीज.
११. शान्तादुर्गा सेवासमिती.
१२. गौ. सा. ब्रा. मेडीकल रिलीफ सोसायटी.
१३. सारस्वत बँक कर्मचारी मंडळ.

### अन्य संस्था

(उद्यम, सहकार, व्यापार व इतर)

१. स्वस्तिक सेफ डिपॉझिट अँन्ड इन्व्हेस्टमेंट्स, लि. (अध्यक्ष)
२. बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड (अध्यक्ष)
३. बॉम्बे स्वदेशी को-ऑपरेटिव्ह स्टोअर्स कं. लि. (अध्यक्ष)
४. किर्लोस्कर ब्रदर्स, लिमिटेड.
५. किर्लोस्कर ऑईल एन्जिन्स, लिमिटेड.
६. किर्लोस्कर न्युमॅटिक्स कंपनी, लिमिटेड.
७. म्हैसूर किर्लोस्कर लिमिटेड.
८. त्रावणकोर इलेक्ट्रो-केमिकल इंडस्ट्रीज्, लिमिटेड.
९. म्हैसूर स्टेट फिनॅन्शियल कॉर्पोरेशन.
१०. मध्य प्रदेश फिनॅन्शियल कॉर्पोरेशन.
११. उगार शुगर वर्क्स, लिमिटेड.
१२. केमो-फार्मा लॅबोरेटरीज्, लिमिटेड.
१३. विदर्भ पेपर मिल्स, लिमिटेड.
१४. पुल्को फाऊंड्रीज्, प्रा. लिमिटेड.
१५. आल्लॅब्स लिमिटेड.
१६. महाराष्ट्र एक्झिक्युटर अॅण्ड ट्रस्टी कंपनी, लिमिटेड.
१७. न्यू बेम्को इंजिनियरिंग प्रॉडक्स् लिमिटेड,
१८. जी. जी. दांडेकर मशीन वर्क्स लिमिटेड.
१९. गोवा टेक्स्टाईल्स् लिमिटेड.
२०. सोशल सर्व्हिस लीग, मुंबई.
२१. रत्नागिरी एज्युकेशन सोसायटी.
२२. महाराष्ट्र स्टेट को. बँक, लिमिटेड (१९४६-५७).

---


### ताश्कंद शहराचा ऐतिहासिक वारसा

भारत आणि पाकिस्तान ह्यांच्यामधील वाद सोडविण्यासाठी रशियातील ताश्कंद ह्या ठिकाणी भारताचे पंतप्रधान श्री. शास्त्री आणि पाकिस्तानचा अध्यक्ष अयूबखान हे दोघे रशियाच्या पुरस्काराने भेटत आहेत. ताश्कंद शहराचा ऐतिहासिक वारसा मोठा आहे. ताश्कंद हे शहर रशियातील उझबेकिस्थान ह्या घटक राज्याची राजधानी आहे. हा भू-भाग एके काळी शिकंदरच्या साम्राज्यात मोडत असे. शिकंदरची भारतावरील स्वारी व नंतरची अपयशी माघार इतिहासप्रसिद्धच आहे. १९ व्या शतकात ताश्कंद प्रथमच युरोपीय म्हणजे रशियन राजवटीखाली आले. तत्पूर्वी चार शतके, उझबेकिस्थानच्या एका पुढाऱ्याने पुढे भारतात आलेल्या बाबराला मध्य आशियातून हुसकून लावले. त्यानंतर बाबर भारताच्या वायव्येने हिंदमध्ये आला आणि त्याने मोगल साम्राज्याची मुहूर्तमेढ रोविली. आजच ताश्कंद उद्योगधंद्यांनी गजबजलेले असून त्याची लोकसंख्या १० लाख आहे.

ठाकरसी फॅब्रिक
-फॅशनसाठी सर्वोत्तम पसंती; सॅन्फोराइज्ड कापड ·SANFORIZED·
रंगदार, रम्य, कमालीचे मोहक
भारी पोत नी टिकाऊ दर्जा हेच त्याचे गमक
ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स



BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES
Make doubly sure by fitting





MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS
GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

### दक्षिण अमेरिकेच्या बाजारपेठेत वाव

हिंदमधील आर्थिक परिस्थितीवर परदेशीय चलनाच्या टंचाई-मुळे फार ताण पडू लागलेला आहे. संरक्षण प्रयत्नांसाठी करावी लागणारी आयात, कारखान्यांसाठी लागणारी आयात आणि अन्नधान्याची आयात ह्या सर्वांसाठीच परदेशीय चलन लागत आहे. ह्या तिन्ही बाबींत अग्रहक्क देता येणे कठीण आहे. अशा परिस्थितीत दक्षिण अमेरिकेतील देशातील बाजारपेठ मिळविण्याचा प्रयत्न करणे भारताच्या हिताचे आहे. ह्यापैकी काही देश ऐनजिनसी बदलाचे करार करण्यास तयार आहेत. अर्जेंटायना हा देश ह्या पद्धतीने गहू व तांदूळ भारताला देण्यास तयार आहे. दक्षिण अमेरिकेतील देश बाहेरील देशांकडून दरसाल सुमारे ४ हजार कोटी रुपये किंमतीच्या मालाची आयात करतात. पण, इतक्या मोठ्या आयातीत भारताचा हिस्सा अवघा २० कोटी रुपयांचा आहे. उलटपक्षी, भारत दक्षिण अमेरिकेतील देशांकडून दरसाल अवघा ४ कोटी रुपयांचा माल आयात करतो. अर्जेंटायना देशाला भारताकडून ताग व तागाचे पदार्थ मुख्यत: निर्यात करण्यात येतात. तथापि अर्जेंटायना स्वत:च तागाचे उत्पादन करण्याच्या खटपटीत आहे. तागाच्या उत्पादनात त्याला यश आल्यास भारताला त्याचा धक्का बसेल. तागाशिवाय अर्जेंटायनात प्लॅस्टिकच्या वस्तू, रासायनिक पदार्थ आणि रंगाचे साहित्य ह्या मालालाही वाव आहे. ब्राझिल देशाने भारताच्या कापडाबद्दल आणि पदार्थ संस्कार करणाऱ्या यंत्रसामग्रीबद्दल उत्सुकता दाखविली आहे. कोलंबिया देशात घरकामात वापरण्यात येणाऱ्या भांड्यांना चांगली मागणी आहे, असा अनुभव आलेला आहे. दक्षिण अमेरिकेतील देशांच्या गरजांचा अभ्यास करून त्या पुरवण्याचे प्रयत्न केल्यास भारताच्या ह्या भागातील निर्यातीत वाढ होईल. व्यापारी करार ऐनजिनसी बदल्याच्या स्वरूपाचे करण्यांत आल्यास परदेशीय चलनाच्या अभावी उत्पन्न होणारी अडचणही भासणार नाही. तांबे, शिसे, जस्त, इत्यादी लोहेतर खनिजे भारताला ह्या देशांकडून मिळण्यासारखी आहेत.

### भारताला सार्वजनिक मालकीच्या विभागाचे महत्त्व

अमेरिकेच्या सिनेटर्सचे एक प्रतिनिधी मंडळ भारताच्या अर्थव्यवस्थेचे निरीक्षण करण्यासाठी आले होते. नियोजन-समितीचे उपाध्यक्ष श्री. अशोक मेहता आणि अमेरिकन प्रतिनिधी मंडळ ह्यांच्यात भारताच्या अर्थव्यवस्थेबद्दल जराशी स्पष्टच चर्चा झाल्याचे वृत्त आहे. सध्या भारताच्या अर्थव्यवस्थेत सार्वजनिक मालकीच्या विभागाला अधिकाधिक प्राधान्य देण्यात येत आहे. त्यामुळे खाजगी मालकीच्या विभागातील परदेशीय भांडवलगुंतवणुकीवर दडपण येत आहे, अशा आशयाची टीका अमेरिकेच्या प्रतिनिधींनी केली असता श्री. अशोक मेहता ह्यांनी भारताची भूमिका विशद केली. ते म्हणाले की, काही सैद्धांतिक विचारांनी भारून जाऊन भारत सार्वजनिक मालकीच्या विभागाचा विस्तार करत आहे असे म्हणणे बरोबर नाही. अर्थव्यवस्थेच्या काही महत्त्वाच्या क्षेत्रात प्रवेश केल्याशिवाय गत्यंतरच नाही, अशीच भारताची परिस्थिती आहे. ह्या बाबतीत खुद्द अमेरिकेतीलच दाखला लक्षात घेण्यासारखा आहे. प्रे. रूझवेल्ट ह्यांनी अमेरिकेच्या ग्रामीण विभागात वीज खेळविण्यासाठी सरकारला पुढाकार घ्यायला लावला. त्यामुळेच अमेरिकेत ग्रामीण विद्युत् पुरवठा होऊ शकला. भारताने एखादी आर्थिक विचारसरणी आत्मसात केलीच असली तर ती एकच आहे, आणि ती म्हणजे देशाचा द्रुतगतीचा आर्थिक विकास साधणे. ह्या सिद्धांताचा पाठपुरावा करताना खाजगी विभागालाही शक्य ती सर्व कामगिरी करण्यासाठी भरपूर वाव देण्यात आलेला आहे. काही विकासाच्या कामाबाबतचे निर्णय त्वरेने अमलात आणण्यात येत नाहीत अगर आलेले नाहीत ही गोष्ट खरी आहे. तथापि, अर्थव्यवस्थेचा साकल्याने विचार केला तर भारताची अर्थव्यवस्था एकंदरीने चांगले काम देत असून तीबद्दल निराश होण्याचे कारण नाही.

### आहाराच्या निकृष्टतेचे गंभीर परिणाम

कॅनडामधील एक आहारतज्ज्ञ डॉ. फेरिस ह्यांनी भारतामधील लोकांच्या आहाराच्या निकृष्टतेविषयी आपले विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणतात की, भारतामधील २० टक्के लोकांना इतका निकृष्ट प्रतीचा व समतोल नसलेला आहार मिळतो की त्यांना शारीरिक श्रमाचे काम करता येणे अशक्य होते. सर्वसामान्य भारतीय माणसाच्या आहारात प्रथिने आणि जीवनसत्त्वे ह्यांचा अभाव असतो. मानसिक अगर शारीरिक व्यापार व्यवस्थितपणे चालण्यास जितके उष्णतामूल्य लागते तितके उत्पन्न करण्याइतके अन्न हिंदी माणसाला मिळत नाही. त्यामुळे त्याच्या शारीरिक कार्यक्षमतेवर आणि मानसिक स्थैर्यावर विपरीत परिणाम होतो. मुलांना सुद्धा काही किमान उष्णतामूल्य पुरविणाऱ्या अन्नाची जरुरी असते. परंतु बहुतेक लोकांना ह्या गोष्टीची जाणीवही नसते.

### शास्त्रीय संशोधन आणि प्रसिद्धी

यु. स्टेट्स नॅशनल सायन्स फौंडेशनच्या अहवालाप्रमाणे, शास्त्रीय संशोधनास वाहिलेली जगात सुमारे १,००,००० मासिके आहेत. शास्त्रीय संशोधनाची गती इतकी झपाट्याची आहे, की संशोधनाचे निबंध छापून येण्यास इतकी मासिकेही अपुरी पडत आहेत. प्रसिद्ध झालेली माहिती संकलित करून कशी ठेवावयाची व त्यातून हवी ती माहिती तत्काळ कशी मिळवावयाची, हे प्रश्न उपस्थित झाले आहेत. प्रसिद्ध झालेल्या संशोधनाच्या निबंधावर नोकरी किंवा बढती अवलंबून असल्यामुळे, तातडीने प्रसिद्धी मिळविण्याची पुष्कळांची खटपट असते आणि संपादकांना अतिशय काळजीपूर्वक निवड करावी लागते. निबंध कमीत कमी लांबीचे होत चालले आहेत. "मायक्रो", पुस्तके आणि कॉम्प्यूटरचा उपयोग, ही आवश्यक होत चालली आहेत.

### ताडीपासून साखर बनविण्याचा कारखाना

आंध्र, मद्रास, म्हैसूर आणि केरळ ह्या राज्यांतील ताडमाडाच्या धंद्यांना मार्गदर्शन करण्यासाठी खादी आणि ग्रामोद्योग मंडळाने एका तज्ज्ञाची नेमणूक केली होती. ताडीपासून गूळ बनविण्याचा ग्रामोद्योग सामान्यपणे सर्वांना माहीत झालेला आहे. ताडीपासून साखरही बनविता येते. आंध्र प्रदेशात अशी साखर तयार करण्याचा एक कारखाना १९६३ साली काढण्यात आला होता. त्याची १२५ दिवसांच्या हंगामातील उत्पादनक्षमता १ टनाची होती. ह्या विषयात पारंगत असलेल्या तंत्रज्ञांचे असे म्हणणे आहे की, अशा प्रकारचे आणखी कारखाने काढण्यात आले तर हंगामात १०० टन साखर तयार करता येईल. ताडीपासून साखर तयार करण्याच्या कारखान्यास लागणारी यंत्रसामग्री देशातील साधने वापरून तयार करता येते. आंध्रमधील कारखान्यात ५० हजार किलोग्रॅमपेक्षा अधिक साखरेचे उत्पादन आतापर्यंत केले आहे.





## वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२९००

**बचतीच्या आकर्षक योजना**

| | |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग | व्याजाचा दर ३॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | " ३। " |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटे | " ५ " |

*मुदतीच्या आकर्षक दरांसंबंधी चौकशी करा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व ''दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.